
श्री

# साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक



ऑक्टोबर १९८२ ] श्री साईबाबा पुण्यतिथी विशेषांक [ किंमत १ रु.

श्री साईनाथ वाचनालय
संस्थान, शिर्डी.

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृती ॥

श्री

# साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान,
शिरडीचे अधिकृत मासिक


: संपादक :

**श्री.क.हि.काकरे**

रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

**डॉ.श्री.दि.परचुरे**
एम. ए. पी. एच. डी.
( इंग्रजी आवृत्ती )

**श्री.सदानंद चेंदवणकर**
( मराठी आवृत्ती )


**श्रीसाई वाक्सुधा**


**वर्ष ६१ वे )    किंमत १ रुपया    ( अंक ७ वा**

**ऑक्टोबर १९८२**

: कार्यालय :
"साईनिकेतन", प्लॉट नं. ८०४-बी, डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई-४०० ०१४.
दूरध्वनी : ४४३३६१
वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख.सह) किरकोळ अंक १ रु. फक्त.



# श्रीसाई वाक्सुधा

संत प्राप्तीचे मार्ग दोन ।
एक भक्ति दुजा ज्ञान ।
ज्ञानमार्गीचे सायास गहन ।
भक्तीचें साधन सोपारें ॥ ७१ ॥

ऐसी सोपी सुलभ भक्ति ।
तरीही अवघे ती कां न करिती ।
तिजलागी महद्भाग्य संपत्ति ।
असतांच तत्प्राप्ति घडतसे ॥ ७२ ॥

कोटि जन्मांचे पुण्य असतें ।
तेव्हांचि संताची गांठी पडते ।
संत समागम सौख्य घडते ।
तेणेंच विकासते निजभक्ति ॥ ७३ ॥

आम्ही सर्व जाणों प्रवृत्ति ।
तेथेंचि आसक्ति नेणों निवृत्ति ।
ऐसी जेथें मनाची वृत्ति ।
ती काय भक्ति म्हणावी ॥ ७४ ॥

जैसी जैसी आमुची भक्ति ।
तसी तैसी आम्हांसी प्राप्ति ।
हे तों केव्हांही घडणार निदिश्चतीं ।
येथे न भ्रांती तिळमात्र ॥ ७५ ॥

—श्रीसाई सच्चरित अध्याय ४९ वा.



सर्व मंगल मांगल्ये
शिवे सर्वार्थ साधिके ।
शरण्ये त्र्यंबके गौरी
नारायणि नमोऽस्तुते ॥

इंद्रादि देवांनी असुरांचा पाडाव व स्वर्गप्राप्ती अशी दुहेरी कार्यसिद्धी झाल्यानंतर या मंगल कारक श्लोकाने शक्तीचे स्तवन करून साष्टांग प्रणिपात केला आहे. या मंत्राचा अर्थ असा—


सर्व कल्याणांची कल्याणरुपिणी तू आहेस, सर्व संन्यस्थनीसांची तू साधिका आहेस, सर्व सदिच्छा हे आदिशक्ती ! तुझ्यामुळेच सिद्धीस जातात. तुला शरण आलेल्यांची तू सर्वस्वी आधारभूत आहेस, तू शिव विष्णूंची परमशक्ती आहेस हे आदी देवते, तुला आमचे नमस्कार असोत.

# अनुक्रमाणिका ऑक्टोबर १९८२

3०८


| | |
|---|---|
| १) विजयादशमी–बाबांची पुण्यतिथी | – संपादकीय |
| २) श्री ताजुद्दीन बाबा | – श्री. गणपतराव सामंत |
| ३) श्रीसाईबाबांचे पवित्र स्थान–शिरडी | – — |
| ४) ब्रह्मनिर्वाण | – — |
| ५) कोजागिरी पौर्णिमा | – श्री. पी. के. बोणे |
| ६) श्री बाबांचा श्राद्धसोहळा | – सौ. उषा प्र. मुळे |
| ७) साईकथा–एक ज्ञानगंगा | – कु. अमोल म. पितळे |
| ८) देव भावाचा भुकेला | – कु. रेखा दिघे |
| ९) ममता | – कु. सुषमा सू. गर्जे |
| १०) साईसद्गुरु भेटले | – कु. जगदीश हिवारे |
| ११) श्री साईबाबांची कृपा | – कु. अमरिश द. प्रधान |
| १२) महादेवीचे स्वरूप ( देववाणी ) | – — |
| १३) आणि दाढदुखी थांबली | – कु. मनोज र. चव्हाण |
| १४) जेव्हा बाबा मला बोलावतात | – कु. आशिष वि. हजारे |
| १५) आईचे कावीळीच्या दाढेतून रक्षण केले | – कु. दिपक रा. रेवणकर |
| १६) गाठ नाहीशी झाली | – कु. प्रशांत द. पाटील |
| १७) साईबाबांची कृपा | – कु. पुष्पलता द. रायकर |
| १८) महानिर्वाण | – श्री. मनोहर कोचरेकर |
| १९) सीमोल्लंघन कविता | – श्री. रघुनाथ शं. जुन्नरकर |
| २०) दसरा उत्सव | – सौ. वसुंधरा रा. चोरे |
| २१) भजन | – नरेंद्रकुमार म. खरनार |
| २२) साईसेवा | – कु. वंदना सावंत |
| २३) शिर्डी माझे घर | – गणेशकुमार रा. पिळणकर |
| २४) साईस्तवन | – कु. राजेश जनार्दन |
| २५) जाऊया शिरडीला | – कु. माधव व. सामंत |
| २६) साई भगवंता | – कु. उदय म. चांदेकर |
| २७) साईनाम मंत्र | – कु. विपीनचंद्र र. चव्हाण |
| २८) साई रे साई | – कु. राहुल अ. खानविलकर |
| २९) साई प्रार्थना | – कु. सुनिल ग. खुस्तले |
| ३०) साईनाथ आरती | – कुमारी सुरेखा ग. पळ |
| ३१) जाऊ शिरडीला | – कु. राजेश राधाकृष्ण गुप्ता |
| ३२) स्वप्नी साई आले | – कु. सौरभ अरुण शहाणे |
| ३३) साई के वास्ते | – कु. दिपककुमार पटवारी |

# विजयादशमी–श्रीबाबांची पुण्यतिथी




आश्विन शुद्ध प्रतिपदेपासून शुद्ध नवमीपर्यंत महिषासुरमर्दिनी देवीचा उत्सव भारतात सर्वत्र साजरा करतात. या उत्सवाला नवरात्रोत्सव असे नाव आहे. नवरात्रातील नवव्या दिवसाला खंडे नवमी असे म्हणतात आणि आश्विन शुद्ध दशमीला विजयादशमी किंवा दसरा असे नाव आहे. हा दिवस साडेतीन मुहूर्तांपैकी एक आहे. या दिवशी कोणत्याही नव्या कामाची सुरुवात केल्यास ते सफल होते. लहान मुलाकडून या दिवशी सरस्वती देवतेची पूजा करवून शिक्षणास आरंभ करण्याची चाल आहे.

अनेक ठिकाणी या सणाचा संबंध राम–रावण कथेशी जोडलेला दिसतो. भगवान प्रभु रामचंद्रांनी रावणाचा वध करून मोठा विजय या दिवशी मिळविला. त्या आनंदाप्रीत्यर्थ हा सण साजरा करण्यास सुरूवात झाली. प्रभूंनी रावणाची दहा शिरे हरण केली व त्यामुळे या दिवसाला 'दशहरा' किंवा कालांतराने 'दसरा' हे नाव पडले.

पार्वतीने रौखदैत्याचा पुत्र दुर्गासूराशी (महिषासुराशी) सतत दहा दिवस युद्ध करून दहाव्या दिवशी त्याला ठार मारून विजय मिळविला. त्या आनंदाप्रित्यर्थ हा दिवस साजरा केला जातो. पार्वतीने 'विजया' हे नाव धारण करून त्या राक्षसावर विजय मिळविला म्हणून ह्या दिवसाला 'विजया दशमी' हे नाव पडले.

प्रभू श्रीरामचंद्रांचा पूर्वज (पणजोबा) रघुराजा हा सर्व पृथ्वीवरील राजांना जिंकण्यासाठी (दिग्विजयासाठी) याच मुहूर्तावर निघाला होता.

दसरा हा शब्द दश म्हणजे दहा, यावरून त्याचा अर्थ दहावा दिवस असा आहे. या दिवशी नवरात्रातील घटासन्निध पेरलेले नवधान्य उपटून देवाला व इतर देवताना वाहतात.

भारतातील सर्व प्रांतात विजयादशमीचा सोहळा साजरा करण्यात येतो. विशेषतः या दिवशी शमीचे पूजन सर्वत्रच केले जाते. त्यासंबंधीची कथा अशी–

पांडव जेव्हा वनवासास निघाले तेव्हा त्यांनी आपली आयुधे शमीवृक्षाच्या खोडात ठेवून दिली. अज्ञातवास पूर्ण झाल्यावर त्यांनी खोडातून आपली सर्व शस्त्रे बाहेर काढली व त्यांची त्याच वृक्षाच्या पानांनी पूजा केली. तो दिवस विजयादशमीचा होता. तेव्हा त्या दिवशी शस्त्रांची पूजा शमीपर्णांनी करावी अशी प्रथा पडली.

भारतात म्हैसूरचा दसरा पहाण्याजोगा असतो. हिमाचल प्रदेश हा किन्नरांचा प्रदेश समजला जातो. तिथे या दिवशी संगीत नृत्यादि कार्यक्रम विशेष होतात. पूर्व भारतात या दिवशी रामलक्ष्मणाची विजय यात्रा रथातून काढण्यात येते. राजपुतान्यात या दिवशी रेड्यांच्या टकरा लावण्यात येतात. नेपाळातील गुरखे हा सण भव्य रीतीने साजरा करतात. ते कुकरीची यथाविधि पूजा करतात. बंगालमध्ये या दिवशी शक्तिदेवी दुर्गादेवीची षोडशोपचारे पूजा करण्यात येऊन तिच्यासमोर बलिपूजा केल्यावर–' रूपं देहि, जयं देहि, यशो देहि, द्विषो जहि ' असे म्हणून वरदान बंगाली मागतात. दुर्गेची मूर्ति नंतर नदीच्या प्रवाहात विसर्जन करण्यात येते. तिथे हा राष्ट्रीय सण म्हणून पाळला जातो. दिल्ली येथील रामलीला मैदानावर या दिवशी विविध कार्यक्रम होतात. त्यावेळी लाखो लोक हजर असतात. गुजरातेत तर देवीसमोर चाललेल्या गरबानृत्यानी प्रत्येक घर दुमदुमून जाते.

महाराष्ट्रात पेशव्यांचे कारकीर्दीत या सणाचे अनन्यसाधारण महत्व होते. ' सीमोल्लंघन ' किंवा शिलंगणाची स्वारी या नावाने हा दिवस मोठमोठ्या मिरवणूका काढून साजरा करीत व अशा प्रसंगी थोरमोठ्या अधिकाऱ्यांना सुद्धा मोठ्या सन्मानाने बोलावित असत.

दसरा हा आमच्या राष्ट्राचा लष्करी सण आहे. तसाच शौर्य, धन व विद्या देणारे महाकाली, महालक्ष्मी, महासरस्वतींचा हा सण आहे. मनुष्याला विद्या, धन आणि शौर्य संपादन करण्यात विजयी करणारी ही विजयादशमी आहे.

ज्यांची कीर्तिकस्तुरी साऱ्या भारतवर्षात दरवळत आहे असे महान् लोकोत्तर पुरुष व निष्ठेचे परम आदर स्थान असलेले महाराष्ट्रातले एकोणिसाव्या शतकातले थोर संत श्री साईबाबा विजयादशमीच्या दिवशी पंचभूतात विलीन झाले. ते ज्या दिवशी अनंतात विलीन झाले ती तारीख १५ ऑक्टोबर १९१८ ही होती. त्या दिवशी विजयादशमी होती. श्रीसद्गुरु साईबाबांच्या या निर्वाण–दिनापासून तो आजपर्यंत त्यांचे भारतभर पसरलेले भक्त त्यांचा हा पुण्यतिथि दिन अतीव उत्साहाने साजरे करीत असतात. महाराष्ट्रातच नव्हे तर भारतात जिथे जिथे श्रीसाईबाबांची मंदिरे आहेत तिथे तिथे विजयादशमीस बाबांची पुण्यतिथी उत्साहाने साजरी केली

जाते. खुद्द बाबांनी ज्या ठिकाणी देह ठेविला त्या शिर्डी येथे तर महोत्सव होत असतो. भारताच्या या संतशिरोमणीचे हजारो भक्त त्या दिवशी आपल्या प्रिय दैवताची पूजा-अर्चा करून मनोमन आपले प्रेम व्यक्त करीत असतात.

●

## श्रीसाईबाबा ६४ वा पुण्यतिथी महोत्सव :

● सर्व साईभक्तांना कळविण्यात येते की यंदा शिरडी येथे श्रीसाईबाबा **६४ वा पुण्यतिथी** महोत्सव **मंगळवार दिनांक २६-१०-८२ ते शुक्रवार दिनांक २९-१०-८२** असे चार दिवस नेहमी प्रमाणे थाटाने साजरा केला जाईल. सर्व साईभक्तांनी हेच निमंत्रण समजून महोत्सवास हजर राहावे अशी विनंती आहे.



## प्रगटे मस्जिद में साई भगवान ! Rs. 36/-

जिसकी बराबरी साईबाबा के जीवन पर लिखी अन्य कोई भी पुस्तकें करने न पायी—यह है हजारों पाठकोंकी प्रतिक्रिया !

हिन्दी अनुवाद : **प्रा. आद्या प्रसाद त्रिपाठी**, एम. ए. बैतुल श्री. रघुनाथ शं. जुन्नरकर द्वारा लिखीत मूळ मराठी उपन्यास

**'मशिदीत प्रगटला परमेश्वर!'** (बिक चुकी) और अंग्रेजी

## "A MISSION DIVINE !" Rs. 45/-

(शीघ्रही खतम होगी)

एक ऐसी उपन्यास जो हर एक के हृदय को जीत लेती है—हृदयात्मा का दर्शन कराती है ! आप भी इसका अवश्य अनुभव किजीए !

**प्रशांति प्रकाशन :** ५ वसंत अपार्टमेंटस, कस्तूर पार्क, शिंपोली रोड, बोरीवली, बम्बई ४०००९२

# सुहास्यवदन संत

# श्री ताजुद्दीनबाबा

—श्री. गणपतराव सामंत, एम. ए.
व्यवस्थापक–श्रीमहालक्ष्मी मंदिर मुं.–२६

● गेल्या वर्षीची नवरात्रातील आठवण की जिचे विस्मरण होणार नाही. नवरात्र असल्यामुळे श्रीमहालक्ष्मीच्या दर्शनार्थ भक्तगणाचे असंख्य थवे लोटत होते. अरबी समुद्राच्या पार्श्वभूमीवर श्रीमहालक्ष्मी सर्वांना दर्शन घडवीत होती. अशाच एका नवरात्रातील रात्री श्री ताजुद्दीनबाबा यांचे आपल्या भक्तगणांसह आगमन झाले. मला बातमी मिळाली. मी लगेच श्रीताजुद्दीनबाबांना मंदिरात आणले. माझी पहिलीच भेट. दर्शन झाल्यानंतर माझ्या कार्यालयात ते आले. धन्य झालो.

नेहमी हसतमुख असणारा हा अबोल संत पाहाताच आपण नतमस्तक होतो पण तत्पूर्वीच आपल्या समोर असणाऱ्या भक्तांचे पाय धरणारा हा संत म्हणजे प्रत्येकामध्ये परमेश्वर आहे याची जाणीव देणारा यादगारचा होय. त्यांचा विनय, त्यांची नम्रता पाहिल्यावर आपणास अत्यंत जवळीक वाढते. भेटीसाठी वशिला नको, रांगेत उभे रहावयास नको, नंबर लावण्यासाठी तिकीट घ्यावयास नको असा हा सामान्यातील असामान्य सत्पुरुष आज कलियुग पुरुषाचे दर्शन सर्वांस घडवीत आहे. त्यानंतर श्रीताजुद्दीनबाबा माझ्याकडे बऱ्याच वेळा आले व आता तर मुंबईस आल्यानंतर त्यांची भेट श्रीमहालक्ष्मी मंदिरास असते.

शिरडीचे श्रीसाईबाबा, शेगावचे श्रीगजानन महाराज, श्रीवासुदेवानंद सरस्वती हे समकालीन श्रेष्ठ संत होत. त्यांच्याच मालिकेतील नागपूरचे श्रीताजुद्दीनबाबा होत. या श्रीताजुद्दीनबाबांनी १९२६ मध्ये समाधि घेतली. हे श्रीताजुद्दीनबाबा नाथपंथीय होते. श्रीसाईबाबा त्यांना 'बेटा बच्चा' किंवा 'सोन्याचे झाड' म्हणत असत असेही माझ्या वाचनात आले आहे.

संतांची परंपरा चालूच असते. समाधिस्थ श्रीताजुद्दीनबाबा एक अवलिया संत होते. त्यांची ताजबाग ठिकाणची समाधि आज एक क्षेत्र बनले आहे, व याच श्री ताजुद्दीनबाबांची परंपरा म्हणा किंवा प्रसाद म्हणा म्हणजे हल्लीचे श्रीताजुद्दीनबाबा–एक निस्सीम साईभक्त.

हल्लीच्या या श्रीताजुद्दीनबाबांची आजी समाधिस्थ श्रीताजुद्दीनबाबांना जेवण घेऊन जात असे. त्यांच्या आशिर्वादाने ताजुद्दीनबाबा जन्मास आले. त्या ताजुद्दीन-बाबांचे उद्‌गार.

तेरे लडकी को खिला देना–
उसको कहना हम तेरे घरमें रहने के लिये आ रहा है।–

या उद्‌गारानंतर हल्लीच्या ताजुद्दीनबाबांचा जन्म नऊ महिन्यात झाला. अगोदर यांना आण्णामहाराज म्हणत पण त्यांचे गुरु श्रीगुलाबबाबा यांनीच आण्णांना ताजुद्दीनबाबा म्हणावयास सुरुवात केली.

आपण आहोत त्याच्यापेक्षा आपण फारच मोठे आहोत असे जर आपणास अनुभवायचे असेल तर एकदाच श्रीगुलाबबाबा यांचे दर्शन घेऊन पहा. युगावतारी कृष्ण जर आपणास पहावयाचा असेल तर श्रीगुलाबबाबांचे दर्शन जरूर घ्या.

'गोपाला गोपाला–देवकीनंदन गोपाला' हा नामगजर ऐकला की संत श्रीगाडगे-महाराजांची आठवण आलीच पाहिजे. अशा श्रीगाडगेमहाराजांनी पंढरपूरच्या विठोबाचे दर्शन घेऊन परतणाऱ्या बाल गुलाबबाबांचे पाय धरावे व म्हणावे 'आज ही कळी आहे उद्या याचा गुलाब होईल.' तीच संतवाणी आज खरी ठरत आहे व अशा कृष्णावतारी श्रीगुलाबबाबांचे शिष्य म्हणजे श्रीताजुद्दीनबाबा.

असे हे संतद्वय एकत्र पाहाण्यास आपण गेलो की देहभान विसरून

देव पहावयास गेलो
तेथे देव होऊन बसलो

अशी परिस्थिती होते. तशात जर श्रीगुलाबबाबांचे भजन चालू असेल तर सर्व शरीर कंपायमान होते. आनंदलहरी निर्माण होतात व आपण आपणास विसरून स्वर्गीय सुखाचा आस्वाद घेतो. अशा श्रीगुलाबबाबांचा प्रसार–प्रचार आज श्रीताजुद्दीनबाबा करीत आहेत.

कणकवलीचे समाधिस्थ श्री भालचंद्रमहाराज अनेक वर्षे उकिरड्यावर साधना करीत होते. अशाच समयी तेथे दानोलीचे संत श्री साटममहाराज आले व त्यांनी कणकवलीवासियांना या उकिरड्यावर असलेल्या हिऱ्याची जाणीव करून दिली. श्री ताजुद्दीन सर्वसामान्य पण आण्णांचा श्रीताजुद्दीन असा नामनिर्देश करून अवताराची कल्पना दिली. यामुळेच जणू–ज्योतीने तेजाची आरती–असा या संतद्वयास बघून खात्री होते.

श्रीसाईबाबा समकालीन श्रीताजुद्दीनबाबांचा हा वारसा आज श्रीगुलाबबाबा बरोबर सर्वत्र संचार करीत आहे. हे श्रीताजुद्दीनबाबा मात्र स्वतःस श्रीगुलाबबाबांचा 'चौकीदार', 'चपराशी' म्हणवितात. केवढा हा विनय. केवढी ही नम्रता.

नाहीतर हल्ली 'बाबां'चे अफाट पीक आले आहे. श्रीसाईबाबा आपणास प्रसन्न झाले. अमूक सिद्धी मिळाली म्हणून मिरविणारे 'बाबा' वाढत आहेत. स्वतःच्या नावावर श्रीसाईमंदिरे स्थापत आहेत. भोळ्या भाविकांची दिशाभूल करीत आहेत. पण त्या उलट श्रीगुलाबबाबा–श्रीताजुद्दीनबाबा आपण श्रीसाईभक्त आहोत एवढेच दर्शवितात. नमस्कारासाठी चमत्कार करीत नाहीत. एखाद्या भक्ताला संकटमुक्त करण्यासाठी जो चमत्कार करतील तोच. या संतद्वयांचे चमत्कार लिहावयाचे ठरले तर त्यावर एक ग्रंथ निर्माण होईल. संतांचे दर्शन झाल्यावर मनास आनंद वाटला पाहिजे. चमत्काराद्वारे आपले सामर्थ्य दाखवून जर भक्ताची विवंचना दूर होत नसेल तर त्या चमत्कारात आनंद कसला! शिरडीस जाऊन आल्यावर आपण 'बाबाच' झालो अशी गैरसमजूत करून घेणे हे भक्ताचे दुर्भाग्य आहे.

या लेखात श्रीताजुद्दीनबाबाबरोबर श्रीगुलाबबाबांचे नाव वारंवार दिसत आहे कारण हे गुरु–शिष्यद्वय वेगळेच करता येत नाही. देव हा इतरत्र नसून तो स्वतः-मध्येच आहे याची शिकवण हे संतद्वय देत आहेत.

हे दोन्ही संत मुंबईस आल्यावर त्यांचा कार्यक्रम वर्तमानपत्रातून प्रसिद्ध होत नाही. करता येणार नाही. कारण ते स्वच्छंद संचार करतात. साखर ठेवल्यावर मुंग्यास आमंत्रण द्यावे लागत नाही, तद्वतच हे संत मुंबईस आल्यावर भक्तांची रीघ लागते. भक्त खेचले जातात. या योगाच्याच गोष्टी आहेत. संत–समागमासाठी भक्तीचे व्यसन लावून घ्यावे लागते. सतत परमेश्वराचे स्मरण ठेऊन भक्तीचे व्यसन वाढविता येते. त्यासाठी पारायणे करावयास नकोत. उपवास तपवासाची आवश्यकता नाही. आसनांची आवश्यकता नाही. नित्याचा व्यवसाय करताना भक्तिमार्गाचे अवलंबन करता येते. एकदा अशी तळमळ लागली की संतसहवास सहज घडतो.

श्रीगुलाबबाबा–श्रीताजुद्दीनबाबा व श्रीसाईबाबांची महति सांगतात. स्वतःस अवतार म्हणत नाहीत. संतांचा प्रचार करणे हाहि एक भक्तिमार्ग आहे. हल्लीच श्रीसाईबाबांच्या सान्निध्यात राहिलेल्या एका एकशेतीस वर्षाच्या श्रीरामबाबाशी संबंध आला. हा संत अबोल आहे. शिस्तबद्ध वर्तणूक, मितभाषिणी, तेजस्वी व्यक्तिमत्व समोर दिसल्यावर एक दैवी व्यक्ति समोर असल्याचा भास न होईल तरच नवल. या

श्रीरामबाबांचे चमत्कार त्यांचेच सिद्ध शिष्य प्रा. जोशी यांजकडून ऐकले. प्रसिद्धी पराङ्मुख असल्यामुळे श्रीरामबाबा मोजकेच बोलतात पण स्वतःविषयी नाही. अनेक संतांचा सहवास लाभणे–त्यांचे दर्शन घेणे हा सुद्धा भक्तिमार्गच होय.

साधु–संताचे वेड मला लहानपणापासून आहे पण श्रीमहालक्ष्मी मंदिराचा कारभार हाती घेतल्यापासून या तीन वर्षांत बऱ्याच संतांच्या सहवासाचा लाभ मिळत आहे. त्यातल्या काहीना मी विचारले की आपण स्वतः परमेश्वरस्वरूप असल्यावर येथे श्रीमहालक्ष्मीच्या दर्शनार्थ का येता ? प्रत्येकाचे उत्तर एकच. आम्हा सर्वांची ही आई आहे. तिची हाक ऐकताच आम्हास यावेच लागते. ही त्रिपूरसुंदरी फार पुरातन असून तिचे येथे वास्तव्य आहे असे स्वतः श्रीधरस्वामीनी सांगितले होते.

ज्यावेळी गेल्या नवरात्रात श्रीताजुद्दीनबाबा येथे आले त्यावेळी श्रीमहालक्ष्मीस त्यांनी जो नमस्कार केला तो अशाच पद्धतीचा होता की त्यात प्रेम, तळमळ, श्रद्धा होती. गेल्या जून महिन्यात श्रीताजुद्दीनबाबा मुंबईस आले. एका भक्ताचा हृदयविकाराचा असह्य झटका स्वतःवर घेतला व ते स्वतः मरणोन्मुख झाले. दोन दिवसात पूर्ववत् होऊन–भक्ताचे त्यांनी रक्षण केले. आपले गुरु श्रीगुलाबबाबा यांची आज्ञा झाली असे म्हणून ते त्याच दिवशी रात्री रवाना झाले. जाताना आपण दोघे लवकरच मुंबईस येऊ असे त्यांनी आश्वासन दिले. श्रीगुलाबबाबांचा वरदहस्त लाभलेले श्रीताजुद्दीनबाबा हे अवलिया ताजुद्दिनाचे अवतार आहेत म्हणूनच त्यांचे नाव श्रीगुलाबबाबांनी ताजुद्दीन ठेवले. श्रीगुलाबबाबांविषयी श्रीताजुद्दिनबाबा फारच थोडे बोलतात व म्हणतात हा बालकृष्णाचा अवतार आहे व मी त्यांचा चौकीदार आहे.

आपल्या समोर आलेल्यांची गरीब–श्रीमंत असा भेदभाव न करता विचारपूस श्रीगुलाबबाबा करतील. भक्तांचे दुःख निवारण करतील. प्रसाद देतील. भक्त भारावलेल्या अंतःकरणाने पण आनंदित होऊन त्यांची रजा घेतील. आपल्यात काहीतरी चैतन्य निर्माण झाल्याचा भक्ताला भास होईल व नित्याच्या व्यवहारात त्याची साधना चालू राहील. श्रीसाईबाबांवरचे प्रेम वाढेल, व आपल्यावर कोणाचे तरी परमेश्वरी छत्र आहे याची भक्तास खात्री होईल.

त्यांचे भजन चालू असताना दैवी आनंद लाभतो. भजन थांबवून ते एकास गाणे म्हणावयास सांगतील. दुसऱ्यास नक्कल करावयास सांगतील, तिसऱ्यास नाचावयास सांगतील व चौथ्यास भाषण करावयास सांगतील. यावरून त्यांचे लक्ष प्रत्येकाकडे आहे–त्या प्रत्येकात काय गुण आहे हे दाखवून प्रत्येकाच्या सुप्त कलागुणांना प्रकट करून त्या भक्तास प्रोत्साहन मिळेल.

गेल्या वर्षाची आठवण माझे वडिलांचे कृपाछत्र हरपले. मी दुःखी मनस्थितीत होतो. एके दिवशी अचानक रात्री अकराच्या सुमारास श्री ताजूद्दीनबाबांचे माझ्या निवासस्थानी आगमन झाले. त्यांनी माझ्याकडे करुणेने पाहिले व मंदस्मित केले. काही बोलले नाहीत. श्रीसाईबाबांच्या तसबीरीकडे पाहून क्षणैक त्यांनी ध्यान लावले. बस्स् एवढ्या पाचच मिनीटात मी माझे दुःख विसरलो. जणू वडील गेले तरी मी तुझ्यामागे आहे असा त्यांचा दृष्टिक्षेप होता. मोठा आधार वाटला. श्रीताजूद्दीनबाबांची अशी ही मुग्ध व अबोल भाषा खरोखरच दुःखाचा विसर पाडून आत्मविश्वास निर्माण करते.

स्वतः सिद्ध असून ते आज कृष्णावतारी श्रीगुलाबबाबा यांचा प्रचार करतात. त्यांना गुरु मानतात. एका कुप्रसिध्द व्यक्तिने वीषाचा पेला दिला असताना त्या वीषाची जाणीव होऊन श्रीगुलाबबाबांचे स्मरण करुन श्री ताजूद्दीनबाबांनी वीष प्राशन केले. परिणाम झाला नाहीच. देणारी व्यक्ति खजिल झाली व चरणी लागली. असे अनेक चमत्कार सांगता येतील.

आता श्रीताजुद्दीनबाबा वारंवार मुंबईस येणार आहेत पण त्यांचा कार्यक्रम जाहीर करता येत नाही. संतसमागम या योगायोगाच्या गोष्टी असतात. भक्तीची तीव्रता निर्माण झाली की संतभेटी होऊन दुःख निवारण होते हा स्वानुभव.

मी लहानपणापासून भक्तिमार्गात आहे. सर्व व्यवहार सांभाळून. देव देव करत प्रयत्न न करता स्वस्थ बसणे म्हणजे भक्तिमार्ग नव्हे. तर आपण प्रयत्न हे केलेच पाहिजेत व तशात जर भक्तीचे पाठबळ असेल तर प्रयत्नास यश येते. साधुसंत भेटतात. मी स्वतः अनेक अशा चमत्कारांचा अनुभव घेतला.

मी कुठल्याही संतावर लिहिताना स्वतःचे अनुभव असतील तरच लिहितो ऐकिवात असलेल्या माहितीवर लेख लिहित नाही. किंवा नुसती सिध्दी दाखविणाऱ्या संताविषयी लिहित नाही. जे संत भक्तांच्या दुःखाचे निवारण करतात त्यांच्याच विषयी लिहितो, व याच मालिकेतील श्रीताजूद्दीनबाबा होत.

आपण संतचरित्राचे पारायण करावयास घेतो. त्या अवधीत काही चांगल्या घटना घडल्या किंवा सत्पुरुषाचे आगमन झाले किंवा सुखदायी स्वप्न पडले किंवा अशाच प्रकारचे शुभदायी पडताळे मिळाले की ते पारायण फलद्रूप होणारच त्याच-प्रमाणे हा लेख मी लिहावयास घेतला व अशाच अनेक शुभदायी घटना घडत आहेत लेख येथपर्यंत आल्यावर मांडूपचे छोटे भगवान यांचे आगमन झाले. ज्या फोटो-

ग्राफरने १२/४/१९०८ रोजी श्रीसाईबाबांचा कॅमेरावर बाबांच्या संमतीने फोटो घेतला होता त्याच फोटोच्या प्रति घेऊन त्याने आत्ताच आणून दिल्या त्याचवेळी अचानक भक्तिमार्गातील मंडळी उपस्थित झाली. हा दैवयोगच जणू श्रीसाईबाबांचा या लेखास आशिर्वाद व प्रोत्साहन.

प्रत्येक लेखाच्यावेळी लहान मोठे अनुभव येतातच पण या लेखास सुरुवात केल्यापासून या क्षणापर्यंत बऱ्याच शुभदायी घटना घडत आहेत याचाच साधा व स्पष्ट अर्थ म्हणजे हा लेख वाचणाऱ्या प्रत्येक भक्तास हा फलद्रूप होईल. त्याची प्रचिती येईल याची खात्री आहे.

★

## साईभक्त दत्ताबाळ यांचे देहावसान

जागतिक कीर्तीचे एक थोरतत्वचिंतक आणि आध्यात्मिक विचारवंत श्री. दत्ताबाळ यांचे ३ सप्टेंबर ८२ रोजी मुंबई येथे काविळीचे विकाराने देहावसान झाले. काही दिवसा पूर्वीच ते परदेश दौऱ्याहून आले होते.

१९६१ साली त्यांनी दत्ताबाळ मिशन डिव्हाइन नावाची आध्यात्मिक संघटनेची संस्थापना केली होती १९६२ साली त्यांना भगवंताचा साक्षात्कार झाला होता. जपानच्या जागतिकधर्म व शांतता परिषदेत त्यांना सन्मानाने बोलावण्यात आलेले होते. विवेकानंद, रामतीर्थ, रामकृष्णा परमहंस, येशू-ख्रिस्त इ. महापुरुषांची चरित्रे त्यांनी आत्मसात केली होती.

महाराष्ट्रातील बहुतेक सर्व संतांच्या कर्मभूमीला त्यांनी भेट देऊन त्या त्या संताचा गौरव केलेला होता. शिरडीला सुद्धा त्यांनी येऊन श्रीसाईबाबांचा अत्यादर पूर्वक गौरव केलेला होता. संस्थानचे तत्कालीन न्यायालयधारक श्री. पाठक साहेब यांनी त्यांचा यथोचित सत्कारही केलेला आहे. निधन समयी दत्ताबाळ यांचे वय अवघे ४१ वर्षांचे होते. श्रीसाई मृताच्या आत्म्यास सद्गती देवो.

[श्री. दत्ताबाळ यांचा परिचय श्रीसाईलीला एप्रिल १९८० चे अंकात प्रसिद्ध करण्यात आला आहे. —का. संपादक]

# सर्वधर्मीय व पंथांना मोहित करणारे श्रीसाईबाबांचे पवित्र स्थान—शिरडी

अनादीकाळापासून आपल्या देशातील अनेक साधुसंतांनी आणि फकिरांनी आपल्या साध्या राहणीने व उच्च विचारसरणीने जातीय सलोख्याचा व सामाजिक एकात्मतेचा संदेश ग्रामीण जनतेला दिला. त्यांच्या पश्चात्यही त्यांच्या शिकवणुकीचा प्रभाव अद्यापही ग्रामीण जनतेवर आहे. अशा महान संतांच्या वास्तव्यानी पुनीत झालेली अनेक स्थळे आजही एकतेचा संदेश देण्याचे कार्य करीत आहेत. शिर्डीचे साईबाबा हे अशाच थोर संतापैकी एक....

---

● अहमदनगर जिल्हा ही संताची भूमी याच जिल्ह्यातील नेवाशाला संत ज्ञानेश्वरांची समाधी आहे. आणि याच गोदावरी नदीच्या तीरी अनेक संतांनी आपल्या शिकवणुकीने जनमानसाच्या सामाजिक व धार्मिक प्रवृत्तीवर आपला ठसा उमटविला. गोदेच्याच तीरावर कोपरगाव नजीक वसलेले शिर्डी हे छोटेसे गाव. हिंदू व मुस्लीम या दोन्ही धर्माच्या लोकांना सारखेच आदरणीय असलेल्या साईबाबांच्या वास्तव्याने पुनीत झालेले हे ठिकाण. येथील मशिदीला 'द्वारकामाई' हे नाव आहे. हिंदू लोक या ठिकाणी भजनांचा गजर करतात तर मुस्लिम बांधव याच ठिकाणी कलमा पढतात. रामनवमीचा उत्सव आणि मुस्लिमांचा उरुस या ठिकाणी एकत्रितपणे साजरा केला जातो. अशा या आगळ्या तीर्थक्षेत्री देशाच्या विविध भागातून निरनिराळ्या जातीजमातीचे व धर्माचे हजारो लोक साईबाबांच्या समाधी दर्शनासाठी येत असतात.

साईबाबांच्या वास्तव्याने या छोट्या खेड्याचे एक मोठे तीर्थक्षेत्र बनले आहे. मुस्लिमांना साईबाबामध्ये पीर दिसतो तर हिंदू त्यांना प्रत्यक्ष परमेश्वराचा अवतार असलेले संत मानतात. गबाळा अंगरखा, धोतर असा वेश आणि अनवाणी पायानी बाबा येथे वावरत असत. हातात एक टिनपाट घेऊन बाबा गावात भिक्षा मागत असत. त्यांना खायला काहीही चाले. त्यांना जिभेला जणू कसलीच चव नसे. भिक्षेत मिळालेल्या पैकी थोडेफार खाऊन उरलेले ते कुत्र्यामांजरापुढे टाकीत.

सुरुवातीला लोक त्यांना वेडपट फकिर म्हणून समजत. ते नेहमी चंचल वृत्तीचे आणि अस्वस्थ वृत्तीचे दिसत. सामान्य गावकऱ्यांना त्यांचे वागणे अगम्य वाटे पण हळूहळू त्यांच्या आंतरिक दैवी शक्तीची ओळख लोकांना पटू लागली.

## तांबोळीबरोबर वाद

एकदा मोहमद्दीन तांबोळी नावाच्या पहिलवानाबरोबर त्यांचा वाद झाला. त्यांचे पर्यावसान मारामारीत झाले. साहजिकच बाबांचा टिकाव लागणे शक्य नव्हते. मात्र तेव्हापासून त्यांनी अभिमानाचा त्याग केला, व साध्या राहणीचा व नम्रतेचा अवलंब केला. केवळ एक कफनी कमरेला शेला व डोक्याला एक फडके अशा वेषात ते राहू लागले. बसायला एक गोणपाट व चिंध्या झालेली वाकळ झोपण्यासाठी त्यांना पुरे असते. ते म्हणत 'राजा होण्यापेक्षा गरीब असणे चांगले. देव गरिबाशीच मैत्री करतो.

साईबाबांना मानापानाचे काहीही वाटत नसे. ते सर्वांमध्ये मिसळत. धंदेवाईक नाचणारीचे गाणे ऐकत. पण त्यांनी आपल्या समाधीचा कधी भंग होऊ दिला नाही. दिवसभर भक्तांच्या गराड्यात व रात्री द्वारकामाई मशिदीत धुनीशेजारी ते पडून रहात. आजही शिर्डीला मंदिराशेजारी ज्या शिळेवर बाबा बसत ती तेथे पहावयास मिळते. त्यांनी अभिमान आणि वासना जणू धुनित टाकून दिल्या होत्या. मुखाने 'अल्ला मलिक' चा गजर सतत चाललेला असे.

जवाहरअली नावाच्या एका फकिराला आपल्या कुराणाच्या ज्ञानाचा गर्व झाला होता त्याने बाबाना आपला शिष्य होण्यास सांगितले. निगर्वी बाबांना त्याचे काहीही वाटले नाही. लवकरच त्या फकिराच्या ज्ञानाचा भ्रमनिरास झाला. व त्याने बाबांच्या पायाशी लोळण घेतली. कारण बाबांनी गर्व सोडून शिष्यत्व पत्करण्याचा स्वतःला ओळखण्याचा मार्ग त्याला दाखविला होता.

राधाबाई नावाच्या एका म्हातारीची गोष्ट. तिने बाबांनी गुरुमंत्र द्यावा म्हणून आमरण उपोषण करायचे ठरविले. दिवसेंदिवस तिची प्रकृती बिघडत चालली. शेवटी बाबांनी तिला 'आई' म्हणून हाक मारली व लेकरावर दया कर म्हणून विनंती केली. ते म्हणाले, मला माझ्या गुरूने कसलाच मंत्र दिला नाही. मी तुला कोणता मंत्र देऊ! माझ्या गुरूने मला निष्ठा व सेवा हेच शिकविले. तुम्ही तुमच्या गुरुवर निष्ठा ठेवा व त्यांच्या मार्फत मानवतेची सेवा करा.

## सगुण व निर्गुण भक्ती

सगुण भक्ती किंवा निर्गुण भक्ती याबाबत बोलताना बाबा म्हणाले, स्वतःला ओळखणे हा खरा भक्तीचा हेतू. ते साध्य करण्यासाठी वृत्तीचे दमन करावे लागते.

त्यासाठी परमेश्वराचे सतत ध्यान करण्याची आवश्यकता आहे. हा परमेश्वर सर्व घराघरातच भरलेला आहे. तुम्हाला निर्गुण भक्ती करता येत नसेल तर सगुण-भक्तीचा अवलंब करा. त्यासाठी सर्व वृत्ती एकवटून ध्यानधारणा करावी. ज्यावेळी ध्याता, ध्यान व ध्येय यात भेद राहणार नाही तेव्हा ध्यात्याचे सद्सद् विवेकाशी एक-रूप होऊन तो ब्रह्मात विलीन होतो.

शिर्डीचे वैशिष्ट्य म्हणजे सगुण व निर्गुण भक्तीचा या ठिकाणी सुरेख संगम आढळतो. साईबाबांचा पूर्णाकृती पुतळा व त्याच्याच शेजारी समाधीही आहे. मुस्लिम बांधव थडग्यावर चादर चढवितात तर हिंदू मूर्तीला हार घालतात. हिंदू श्लोक म्हण-तात तर, मुस्लीम कलमा पडतात.

बाबांनी १५ ऑक्टोबर १९१८ रोजी महासमाधी घेतली त्यावेळी काही कर्म-ठांनी धार्मिक रंग देऊन स्वतःकडे श्रेय घेण्याचा प्रयत्न केला. पण तो फसला. सम-जूतदार प्रवृत्तीचा जय झाला व बाबांचा देह बुटी वाड्यात पुरण्यात आला. जवळच त्यांचा पूर्णाकृती पुतळा बसविण्यात आला.

बाबा हिंदूही होते व मुसलमानही होते. ते द्वारकामाई नामक मशीदीत राहात रामनवमीच्या दिवशी उरूस भरत असे. कालांतराने उरूसाचे रामनवमीत रूपांतर झाले. त्यादिवशी भक्तजन जमतात. फार मोठी यात्रा भरते, कीर्तन होते, व मिरवणूक निघते दोन ध्वज मिरवत नेऊन मशीदीच्या दोन बाजूंना रोवण्यात येतात.

## संदीलीची प्रथा सुरू

मुस्लीम संतांच्या स्मरणार्थ संदलीची प्रथा अमीर शक्कर यांच्या सूचनेनुसार सुरू करण्यात आली. रामनवमीच्या दिवशी एका थाळीत चंदनाचा गंध व चंदनाचे तुकडे मिरवीत नेण्यात येतात. मशीदीत आल्यावर ते तेथील भिंतीवर उडविले जातात. हिंदूंची ध्वजमिरवणूक व मुस्लीमांची संदल मिरवणूक वर्षानुवर्षे कसलाही अनुचित प्रकार न घडता येथे चालू आहे.

सुमारे साडेतीन शतके आधी अकबराने विविध धर्मातील चांगली तत्वे एकत्र करून दिने इलाही या जागतिक धर्माची स्थापना केली होती. परंतु हा प्रयत्न दरबारी-स्तरावर झाल्याने तो यशस्वी होवू शकला नाही. साईबाबांनी मात्र भारत हा मुख्यतः खेड्यात असल्याने ग्रामीण स्तरावर सर्वधर्मसमभावनेचे तत्व जनतेला आचरणात आणण्याची शिकवण दिली, व म्हणूनच त्याला बऱ्याच प्रमाणात यश आले.

सर्व धर्मांचे, पंथाचे, जातीचे यात्रेकरु शिर्डीला येत असतात. त्यांची दिवसे-दिवस वाढती संख्या हे पारंपारिक सहिष्णुता व बंधुत्वाच्या भावनेच्या विजयाचे प्रतीक आहे. द्वारकामाई नामक मशीद ही एकात्मता, जातीय संलोखा यांचे राष्ट्रीय प्रतीक बनली आहे.

●

# ब्रह्मनिर्वाण

卐——卐

● १९१८ चा सप्टेंबर महिना उजाडला. बाबांची प्रकृती आता दिवसेदिवस क्षीण होत चालली होती. आपल्या भक्तांच्या कल्याणासाठी त्यांनी अपार कष्ट सहन केले होते. फकीर आणि भिकारी यांच्या उदरनिर्वाहाची त्यांनी शेवटपर्यंत सतत काळजी वाहिली होती. त्यांचा आणि आपल्या भक्तांचा त्यांना कधीच विसर पडला नव्हता. अनेक भक्तांचे रोग त्यांनी स्वतःवर ओढून घेतले होते.

खापर्डे यांचा मुलगा शिरडीलाच आजारी पडला होता. त्याला 'ब्युबॉनिक प्लेग' झाला. बाबांनी तो रोग स्वतःवर ओढवून घेतला आणि त्या पोराला बरा केला. अशा अनेक कारणांमुळे बाबांच्या प्रकृतीवर दुष्परिणाम झालेला होता.

२८ सप्टेंबर १९१८ या दिवशी बाबांच्या अंगात बराच ताप भरला आणि त्यांनी आपल्या बिछान्यावर डोके टेकले. अंगात ताप असल्यामुळे त्यांना बराच अशक्तपणा वाटू लागला होता. आपल्या मशिदीत नेहमीच्या जागेवर ते तसेच पडून राहिले होते. बाबा तसे आजारी पडल्यावर त्यांच्या शिष्यांची बरीच धावपळ झाली होती. बाबांना बरे वाटण्यासाठी आपण काय करावे नि काय करू नये असे त्यांना होऊन गेले होते—बाबा डोळे मिटून आपल्या बिछान्यावर स्वस्थ पडून राहिले होते.

तीन दिवसानंतर त्यांच्या अंगातला ताप उतरला आणि त्यांना बरे वाटले. पण त्यानंतर त्यांनी आपले नेहमीचे खाणे वर्ज्य केले. जेवण घ्यायला त्यांनी नकार दिला. पोटात काहीच न गेल्यामुळे त्यांना बराच अशक्तपणा वाटू लागला. 'आपण व्यक्ता-कडून अव्यक्ताकडे जात आहोत' 'आपल्या सीमोल्लंघनाचा दिवस नजिक येवून ठेपला आहे' अशी भाषा त्यांच्या तोंडून निघू लागली.

आपला अहंकार नष्ट करण्यासाठी–आपला अहंपणा साफ घालविण्यासाठी बाबांनी आपल्या आयुष्यातल्या शेवटच्या दिवसातही खांद्यावर झोळी घेऊन दारोदार भीक मागितली होती. त्यांना असे कष्ट पडू नयेत म्हणून त्यांच्या काही शिष्यांनीसुद्धा त्यांची परवानगी घेऊन–त्यांची झोळी खांद्यावर घेऊन दारोदार भीक मागितली होती. पण आता बाबांनी खाणेच सोडून दिले.

एका मुसलमान फकीराला त्याच्या स्वप्नात बाबांच्या मृत्यूसंबंधीचा आदेश मिळाला होता. त्या फकिराची बाबांवर नितांत श्रद्धा होती. त्याच्या मनात बाबांबद्दल अपार भक्ती होती, आदेश होता, 'अल्लाचा प्रकाश ह्या मर्त्य शरीरातून काढून घेतला जात आहे.' याचाच अर्थ शरीरात रहाणारा आत्मा आता शरीर सोडून जायला निघाला आहे. आत्मा परमात्म्याला भेटायला निघाला आहे. हजारोंचा तारणहार आता जाणार–

दीनांचा दीनानाथ आता त्यांना अंतरणार म्हणून तो फकीर ढसढसा रडला.

बाबांची सेवासुश्रूषा करणाऱ्या भक्तांनासुद्धा त्यांनी तशी सूचना दिली होती. वझे नावाचे एक विद्वान याच सुमारास बाबांच्या सान्निध्यात आलेले होते. त्यांना बाबांनी आपल्या बिछान्याजवळ बसवून घेतले.

त्यांना 'रामविजय' हा ग्रंथ वाचायला सांगितला आणि बाबा मन एकाग्र करून ते वाचन ऐकत राहिले. त्या ग्रंथाचे पारायण, वझे सतत तीन दिवस करीत राहिले होते. बाबा डोळे मिटून श्रवण करीत होते. पारायण पुरे झाल्यानंतर, बाबांनी वझे यांना श्रीफळ व दक्षिणा देऊन त्यांचा गौरव केला. ह्यानंतर बाबा आपल्याजवळ असलेल्या रोकड पैशाचा गरीबांना दानधर्म करीत होते. आपले शिष्य काका दिक्षित, गोपाळराव बुटी अशा काही शिष्यांना त्यांनी आपल्याजवळ रहाण्याचा सल्ला दिला होता. शामा ( माधवराव देशपांडे ) अब्दुल, तात्या हे त्यांचे जुने भक्त तर सदैवच त्यांची सेवासुश्रूषा करण्यात धन्यता मानीत होते. एक रात्री आड चावडीमध्ये झोपायला जाण्याचा परिपाठ आता त्यांनी बंद केला. मशिद सोडून ते आता कुठेच बाहेर जात नव्हते. आपल्या आयुष्याच्या शेवटच्या काळात, बाबा रात्रंदिवस आपल्या मशिदीतच पडून होते.

दि. १५ ऑक्टोबर १९१८
मंगळवारचा दिवस होता.
आणि त्या दिवशी दसरा होता.
'दसरा सण मोठा नाही आनंदा तोटा'

—मग काय शिरडीतल्या घराघरांना पानाफुलांची तोरणे लावली होती. सोने वाटायचा दिवस म्हणून लोक आपट्याची पाने गोळा करीत होते. घराघरांतून आनंदाचे नि उत्साहाचे वातावरण. पण इकडे बाबा, आपल्या मशिदीत बिछान्यावर पडून होते. मर्त्य देहाच्या शेवटच्या घटका ते मोजीत राहिले असावे.

त्या दिवशी ते बरेच अस्वस्थ आणि बेचैन होते तरीसुद्धा त्यांच्या भक्तांनी त्यांची सकाळची आणि दुपारची पूजा–आरती केली. दुपारची पूजा आटोपल्यानंतर त्यांनी काहीही खाण्याला नकार दिला. ते उपाशीपोटी तसेच पडून राहिले होते. त्यांच्यासाठी तयार केलेला-त्यांच्या पुढ्यात ठेवलेला नैवेद्य तसाच पडून राहिला होता. बिछान्यावर पडून त्यांनी आपले डोळे मिटून घेतलेले होते. सेवा करीत तेथे बसलेल्या आपल्या शिष्यांना पाळीपाळीने आपापल्या घरी जेवायला पाठवले. एकेक क्षण आता सर्वांना मोलाचा वाटत होता. त्यांची ही अशी बेचैन अवस्था पूर्वी कधीच कुणी पाहिलेली नव्हती. फारच क्वचित प्रसंगी ते असे आपल्या बिछान्यावर पडलेले दिसत.

काका दिक्षित आणि श्रीमंत गोपाळराव बुटी हे दोघे मशिदीत बाबांजवळ बसून राहिले होते. शामा देशपांडे आणि इतर काही भक्त आपले जेवण आटोपून मशिदीत परत आले आणि मग त्या दोघांना त्यांच्या घरी जेवायला जायला बाबांनीच सांगितले.

दोघे जेवण्यासाठी मशिदीबाहेर पडले त्यावेळी शामा (देशपांडे) दुःखी मुद्रेने त्या मशिदीच्या पायरीवर बसून राहिले होते. तर तात्या, नानासाहेब निमोणकर, लक्ष्मण भागोजी, लक्ष्मीबाई शिंदे अशी सारी मंडळी बाबांची सेवा करण्यासाठी त्यांच्याजवळ म्लान चेहऱ्याने बसून होती. सर्वांचे डोळे त्यांच्या तब्येतीकडे लागलेले होते. काही वेळाने ते एकदम आपल्या बिछान्यावर उठून बसले. लक्ष्मीबाई शिंदे ही वृद्धा जवळच बसलेली होती. तिला त्यांनी आणखी आपल्याजवळ बोलावून घेतले. आपल्या खिशातले रुपये बाहेर काढून त्यांनी मोजायला सुरुवात केली. आता त्यांच्याजवळ केवळ नऊच रुपये उरलेले होते. बाकीच्या पैशाचा त्यांनी कधीच दानधर्म करून टाकला होता. आपल्या जवळचे ते शेवटचे नऊ रुपये त्यांनी लक्ष्मीबाईच्या हातावर ठेवले पण त्यावेळी त्यांनी आपल्या तोंडून एकही शब्द उच्चारला नाही. तोच त्यांच्या आयुष्यातला अंतिम दानधर्म होता. लक्ष्मीबाईने आदरपूर्वक त्यांनी दिलेल्या त्या रुपयांचा स्वीकार केला आणि ती जरा दूर जाऊन बसली. त्या वृद्धेने बाबा शिरडीत अवतरल्यापासून त्यांची मनोभावे सेवा केली होती. आपल्या सेवेत तिने कधीच अंतर पडू दिले नव्हते. बाबा परत आपल्या बिछान्यावर पडून राहिले. त्यांनी आपले डोळे मिटून घेतले होते. परंतु श्वासोच्छ्वास करणे आता त्यांना जड जाऊ लागले. आपला श्वास कोंडतो आहे असे त्यांना वाटू लागले.

दुपारची वेळ झाली होती.

घड्याळात दुपारचे अडीच वाजले होते. आकाशातला सूर्य त्यावेळी जरा ढगाआड झाला असावा. बाबांची ही कठीण अवस्था सूर्याला पहावली नाही. बाबा उठून बसले. त्यांनी आपली मान जवळ बसलेल्या तात्या पाटीलच्या खांद्यावर ठेवली. तात्याच्या कानात ते पुटपुटले—

'मला श्वास घेता येत नाही–बुटीच्या वाड्यावर मला घेऊन चला त्या तेथेच मला पडायची व्यवस्था करा.'

बाबांच्या मुखांतून बाहेर पडलेले हेच त्यांचे शेवटचे शब्द !

शब्द पुटपुटले आणि त्यांनी पुन्हा आपली मान तात्यांच्या खांद्यावर टाकली काही मिनिटांच्या अवधीत त्यांच्या शरीराची हालचाल पूर्णपणे बंद पडलेली होती. त्यांचा श्वासोच्छ्वास बंद पडला होता. नानासाहेब निमोणकर जवळच बसलेले होते. त्यांना संशय आला—

जवळच्या भक्तांनी पेल्यातले पाणी घेऊन, पाणी बाबांच्या तोंडात घालण्याचा त्यांनी प्रयत्न केला. परंतु पाण्याचा घोट घेतला गेला नाही. पाणी तोंडातून तसेच बाहेर पडले.

पाणी गालावरून खाली ओघळले.

सर्वांनी ओळखले. सर्वांच्या डोळयात अश्रू उभे राहिले. सर्वांचे गळे दाटून आले. श्रीसाईबाबांचा आत्मा त्यांच्या पार्थिव देहाला टाकून गेला होता.

त्यांच्या जड देहाला ठेवून गेला होता ! श्रीसाईबाबांचे ब्रह्मनिर्वाण झाले !

नानासाहेब निमोणकर यांना आपला हुंदका आवरला नाही–'देवा–देवा–तू हे काय केलेस ?' त्यांच्या तोंडून उद्‌गार बाहेर पडले.

श्रीसाईबाबा 'ब्रह्मनिर्वाण' पदाला पोचले. ती बातमी विजेच्या वेगाने शिरडी गावात पसरली आणि अवघी शिरडी शोकसागरात बुडाली. आंधळे, अपंग–लुळेपांगळे –सान-थोर–रावरंक–अमीर-फकीर–भिकार-दुकार, सारेजण दुःखावेगाने मशिदीकडे धावत सुटले.

शिरडीतला प्रकाश मावळला होता.
शिरडी प्रकाशाला मुकली होती.
शिरडीतला कोहिनूर हिरा हरपला होता.
स्त्रिया ढसढसा रडल्या–

पुरुषांनाही आपला शोक आवरता आला नाही. साईभक्तांचा अखंड ओघ मशिदीकडे लागला होता–शिरडीतल्या साऱ्या गल्लीबोळांचा मोर्चा त्यावेळी बाबांच्या मशिदीकडेच वळलेला होता. शिरडीतल्या एकूण एक घरावर, त्यावेळी दुःखाची छाया पसरली होती. शिरडीतल्या साऱ्या लोकांचे चेहरे दुःखी आणि म्लान दिसत होते. कुणालाच आपले रोजचे काम करायला सुचत नव्हते. गावातल्या कुत्र्यांचे भुंकणे ऐकू येत नव्हते. वारा वाहात नव्हता. झाडांच्या पानाची सळसळ बंद पडली होती. झाडावर बसलेले पक्षी किलबिल न करता स्वस्थ बसले होते. काही स्त्री पुरुषांची दुःखावेगाने शुद्धीच हरपली. त्यांच्या डोक्यावर पाणी मारून–त्यांचे सांत्वन करून त्यांना शुद्धीवर आणावे लागले. काही स्त्रियांचा आक्रोश ऐकवत नव्हता–कुणाचे कुणी सांत्वन करावे? कुणाचे कुणी समाधान करावे तेच समजेनासे झाले होते–सर्वांच्या हातापायातली शक्तीच जणू नाहीशी झाली होती. सर्वांचे मेंदूच जणू काय बधीर झाले होते.

बाबांचे मुसलमानधर्मीय भक्त, मशिदीभोवती गोळा झाले होते. त्यांना वाटले की बाबा हे मुसलमान संत आहेत. त्यांचा पार्थिव देह उघड्या जागेत पुरायला हवा. त्यावर कबर बांधायला हवी. आणि मुसलमानी धर्माप्रमाणेच त्यांचे दफन करायला हवे. खुशालचंद, अमीर शक्कर इत्यादी मुसलमान पुढारी तेथे हजर झाले होते. बाबांचा मृतदेह आपल्या ताब्यात दिला जावा अशी त्यांची इच्छा होती.

परंतु शिरडीतल्या हिंदु साईभक्तांनी, त्यांच्या ह्या कल्पनेला विरोध केला. त्यांनी आग्रह धरला की बाबांचा मृत देह श्रीमंत गोपाळराव बुटी यांनी बांधलेल्या दगडी वाड्याच्या आतल्या भागातच पुरला जाईल.

शिरडी गावाची पाटीलकी त्यावेळी रामचंद्र पाटील यांच्याकडे होती. त्यांनी सुद्धा हिंदु साईभक्तांच्या या आग्रहाला आपली मान्यता दिली. परंतु शिरडीतल्या मुसल्मानांना, गावच्या पाटलांचा हा निर्णय न्याय्य वाटत नव्हता आणि तसला अन्याय सहन करायला त्यांची तयारी नव्हती.

बाबांचे हिंदु भक्त आणि मुसलमान भक्त यांचा हा झगडा चालू होता आणि बाबांचा मृतदेह तिकडे मशिदीत तसाच पडून राहिला होता. त्यावर फुले वाहिली जात होती. उदबत्त्यांच्या सुवासाने सारी मशीद भरून गेली होती–काही साईभक्त, त्यांचे अंत्यदर्शन घ्यायला पुन्हा पुन्हा त्या मशिदीत जात होते.

सर्वांना काळजी वाटत होती की नव्याने उभा राहिलेला हा बिकट प्रश्न सुटणार कसा काय ? बाबा खरोखरच हिंदु होते की मुसलमान होते ? त्यांचा अंत्यविधी केला

जाणार की त्यांचे दफन केले जाणार ? एका थोर सत्पुरुषाच्या मृत्युनंतर हा अशा प्रकारचा वाद निर्माण व्हावा याचेच सर्वांना वाईट वाटत होते.

बाबांचा मृतदेह नीट सजवण्यात आला आणि साईभक्तांच्या दर्शनासाठी तो बसलेल्या अवस्थेत ठेवण्यात आला. त्या देहाची पूर्वीप्रमाणेच सकाळी-दुपारी-संध्याकाळी पूजा आणि आरती केली जात होती. फुले वाहिली जात होती.

आरती ओवाळली जात होती.

तासामागून तास उलटत होते, परंतु त्या वादाचा शेवट होत नव्हता. निकाल लागत नव्हता.

मुसलमान साईभक्तांनी, मृतदेहाची पूजा-आरती करायला विरोध दर्शविला. तेव्हा लक्ष्मण मामा जोशी ( हे माधवराव देशपांडे यांचेच मामा होत. ) नावाचे एक गृहस्थ पुढे झाले आणि त्यांनी त्यांची समजूत घातली की 'दसऱ्याला रात्री बाबा माझ्या स्वप्नात आले आणि त्यांनीच मला पूजा व आरती करायची आज्ञा केलेली आहे. तेव्हा आमच्यासाठी नव्हे पण बाबांच्या इच्छेचा मान राखण्यासाठी तरी तुम्ही गप्प बसायला हवे.'

दुसऱ्या दिवशी दि. १६ ला बाबांची पूजा लक्ष्मणमामा जोशी यांनी केली तेव्हा मुसलमान साईभक्त त्या पूजेत सामील झाले होते. हिंदु साईभक्तांनी बाबांच मृतदेह पुरण्यासाठी बुटी यांच्या दगडी वाड्यात खड्डा खणायला सुरवात केली. मुसलमान साईभक्त त्यामुळे खवळले. ती गोष्ट त्यांना पसंत पडली नाही वादाला पुन्हा तोंड फुटले.

शेवटी मामलेदारसाहेबाना या वादामध्ये पडावे लागले. त्यांनी शिरडीतल्या लोकांच्या मताचा कौल घेऊन, त्या वादाचा निकाल लावण्याचे ठरविले.

शिरडी गावकऱ्यांच्या मताचा कौल घेतला गेला. उघड्या जागेवर दफन करण्याऐवजी बाबांचा मृतदेह बुटी यांच्या दगडी वाड्यातच पुरण्यात यावा या मताचे लोक दुप्पट निघाले. अर्थात्च मताचा कौल, हिंदु साईभक्तांच्या बाजूने लागला होता. मुसलमान साईभक्त हिरमुसले होते तर हिंदु साईभक्तांना आनंद झाला होता. मुसलमान साईभक्त हा मताचा कौल मानायला मुळीच तयार नव्हते. त्यांचे म्हणणे एकच 'साईबाबा मुसलमान आहेत, त्यांचे दफन आमच्या धर्मानुसार झाले पाहिजे. दुसरी बात नाही.'

मामलेदारसाहेबांचा आता निरुपाय झाला. हा वाद त्यांनी कलेक्टरसाहेबांपुढे ठेवण्याचा विचार केला. कलेक्टरसाहेब शिरडीपासून दूर, अहमदनगरला बसलेले होते.

हिंदु साईभक्त तितक्या दूर अहमदनगरला कलेक्टरसाहेबाकडे जायला निघाले आणि एक चमत्कार घडून आला.

एक दैवी चमत्कार घडून आला असेच इथे म्हणायला हवे.

श्रीसाईबाबांनीच आपल्या मुसलमान भक्ताचे मतांतर घडवून आणले असावे– मुसलमान साईभक्त, हिंदूबरोबर आनंदाने सहकार्य करायला पुढे सरसावले.

बुटी यांच्या दगडी वाड्यात आता बाबांची समाधी बांधली जाणार होती. वादाचा असा गोड शेवट झाला.

सर्वांना आनंदी आनंद झाला.

पण बाबांचा मृतदेह, आपल्या भक्तांना दर्शन देत, पुरेपूर छत्तीस तास, होय दीड दिवस, तसाच बसून राहिला होता. त्या वादाचा शेवट व्हायला छत्तीस तास एवढा अवधी लागला होता.

दि. १६ आक्टोबर १९१८ बुधवारी संध्याकाळी, बाबांचा मृतदेह त्यांच्या मशिदीतून हालवायला सुरवात झाली.

हिंदु शास्त्राप्रमाणे त्या देहावर सारे सोपस्कार केले जात होते. तो देह अजूनही ताठर बनलेला नव्हता. सारे अवयव वळवावे तसे वळत होते. ठेवावे तसे ठेवले जात होते. हात लावणाऱ्यांना आश्चर्य वाटत होते की इतका काळ उलटला तरी बाबांचे अवयव असे लवचिक कसे काय राहिले ! तो आणखी एक दैवी चमत्कार होता. त्यांच्या अंगातली कफनी अगदी सहजगत्या काढली गेली. कातर मुळीच वापरावी लागली नाही.

बाबांना आंघोळ घालण्यात आली. त्यांची पुन्हा एकदा पूजा झाली.

बुटी यांच्या दगडी वाड्यातील योजलेल्या जागी त्यांचा मृतदेह ठेवला गेला. त्यावर कापूर पसरण्यात आला–मीठ पसरण्यात आले–अत्तर शिंपडण्यात आले.

गुलाबपाण्याचा फवारा मारण्यात आला. श्रीसाईबाबांच्या अंत्यसंस्काराचे पौरोहित्य उपासनी महाराज आणि बाळासाहेब भाटे या दोघांनी केले होते.

शिरडीतला बुटी यांचा तो दगडी वाडा, श्रीकृष्ण मंदीरासाठी योजला होता– पण त्याचे आता श्रीसाईबाबांच्या समाधीमंदीरात रूपांतर झाले होते.

हिंदु, मुसलमान, पारशी, ख्रिश्चन सर्व धर्मांचे यात्रेकरू या समाधी मंदीराचे दर्शन घ्यायला मोठ्या श्रद्धेने येतात. भक्तिभावाने या समाधीला नमस्कार करतात. आणि श्रीसाईबाबांचा आशिर्वाद घेऊन, येथून परत जातात.

बाबांच्या त्या समाधीला–

माझेही शतशः प्रणाम !

# चांदण्या प्रकाशात उत्साही वातावरणात साजरी होणारी कोजागिरी पौर्णिमा

—श्री. पी. के. बोणे, मुंबई

कोजागिरी पौर्णिमेच्या दिवशी असंख्य लोक रात्रभर जागरण करतात. चांदण्याच्या प्रकाशात दूधात मसाला टाकून ते उकळून पितात. निरनिराळे कार्यक्रम आयोजित करून आनंदोत्सव साजरा करतात परंतु यासंबंधीची आख्यायिका फारच थोड्या लोकाना माहीत आहे. श्री. बोणे यांच्या या लेखातून ही आख्यायिका आमच्या वाचकांना कळावी म्हणून **३१ ऑक्टोबर**च्या कोजागिरी पौर्णिमेनिमित्ताने आम्ही येथे मुद्दाम देत आहोत.

● नुकत्याच पडून गेलेल्या पावसाने सगळीकडे आनंदाचे वातावरण निर्माण झालेले असते. सृष्टीदेवी या वरुण राजाच्या अभिषेकाने न्हाऊन आणि वस्त्र नेसून डौलाने उभी आहे. श्रावणातील रिमझिम रिमझिम पावसाची कंटाळवाणी कटकट संपून भाद्रपदात आगमन होते; त्या आद्यदेवता गणरायाचे स्वागतास आबालवृद्ध दहा ते पंधरा दिवस सतत झटत असतात. डेकोरेशन, आरती आणि भव्य देखाव्यांनी डोळ्यांची पारणी फिटतात. सर्वांना आशिर्वाद देत गणपतीबाप्पा जातात नी आगमन होते त्या आनंदी सणाचे म्हणजेच विजयादशमीचे! भरपूर अन्नधान्याची रास घरात येऊन ' अन्नपूर्णा ', प्रसन्न झालेली असते. आकाश निरभ्र व स्वच्छ होऊन असंख्य चांदण्या व तारे सृष्टीकडे टक लावून बघत असतात. कारण गेले ३-४ महिने त्यांना मेघराजांच्या अडथळ्यामुळे काही दिसत नव्हते. आता ते देखील आपसात लपंडा खेळीत भूमातेच्या हिरव्या शालूची तारीफ करीत असतात. तोपर्यंत हळुहळू डौलात येतो आश्विन महिना!

आश्विन महिन्यात आकाशाला सुंदर तेज निर्माण होते. चंद्र आणि चांदण्यांची जास्त प्रकाश कोण देणार यावर स्पर्धा सुरू होते. चंद्र मात्र हसत हसत असतो. कारण सर्व ताऱ्यांच्या प्रकाशाची वीज पुरवठा वायर आणि त्या वायरीचे कनेक्शन चंद्राजवळ असते. तरीही स्पर्धा लावून स्पर्धकांचे कार्य पार पाडावयाचे एवढे चांदोबाला ठाऊक! चांदोबा खुष! तारे खुष...पण एवढ्या स्पर्धा एवढा प्रकाश का? असा प्रश्न पडणे स्वाभाविकच नाही का? होय! याचे उत्तर देखील मोठे गमतीचे आहे. कारण याच

आश्विनात आगमन होते त्या कोजागरी पौर्णिमेचे ! आणि याच पौर्णिमेच्या दिवशी या चंद्रताऱ्याच्या प्रकाशात पृथ्वीवर फिरायला येतात त्या लक्ष्मीदेवी !

## कोजागिरीची आख्यायिका

कोजागरी याचा खरा उच्चार आहे 'को जागर्ति ! म्हणजे कोण जागे आहे ? या कोजागरी पौर्णिमेला असंख्य लोक रात्रभर जाग्रण करतात. दुधाला चांदण्याच्या प्रकाशात उकळून मसाला टाकून ते दूध पितात. रात्रभर खेळ, स्पर्धा गप्पांना उधान आलेले असते. जी व्यक्ती जागी असलेली पाहून लक्ष्मी त्याच्याकडे कुठल्या ना कुठल्या रूपाने येऊन आशिर्वाद देऊन जाते अशी आख्यायिका आहे. चंद्रप्रकाशात दूधाचे उकळणे हेदेखील शास्त्रीयदृष्ट्या चांगले समजले जाते. चंद्रप्रकाशाचे किरण दूधात मिसळल्यावर एकप्रकारची शक्ती आणि त्या शक्तीद्वारे शरीरातील रक्तवाहिन्याचे शुद्धीकरण होत असते. शिवाय शरिरातील रोगजंतूंचा या चंद्रकिरणामुळे नायनाट होऊन शरीर निरोगी राहते असे संबोधले जाते. शिवाय दूध हे पूर्णान्न आहे. त्यात या नैसर्गिक किरणांच्या मेसळीने त्याचे रूपांतर 'अमृतरूपीदुग्धात न झाल्यास नवलच !'

## मुंबईतील सोहळा

मुंबईत हा कोजागरी पौर्णिमेचा सोहळा प्रत्येक घराच्या गच्चीत अथवा मैदानात साजरा होतो. स्त्रिया या चंद्रप्रकाशात फुगड्या, झिम्मा, संगीत खुर्ची, लपंडाव या सारखे खेळ खेळतात तर पुरुष आट्यापाट्या, पत्ते, गाण्यांच्या भेंड्या सारख्या खेळात मग्न असतात. मुंबई चौपाटीवर समुद्रातील शांत वाऱ्यात असंख्य मुंबईकर सहकुटुंब रात्रभर गोल वर्तुळाकार बसलेले असतात. तरुण मुलांचा गट मधुनच वाद्यांचा गोंगाट करीत व गाणे म्हणत या टोकापासून त्या टोकापर्यंत जात असतात. लहान मुलांचे लक्ष वाळुतील किल्ल्याकडे असते, फेरीवाले मधुनच पिपाण्यांच्या आवाजात तेथील वातावरण दुमदुमून टाकतात. समुद्राच्या लाटा देखील सामूहिक नृत्य करीत व या लोकांच्या आनंदात भर टाकीत असतात. कारण पौर्णिमेलाच समुद्राला आलेली भरती देखील योगायोगाचेच कारण म्हणायला हवे ! थोडक्यात सृष्टीवरील स्त्री, पुरुष, समुद्र आणि वृक्ष आश्विनी पौर्णिमा उर्फ कोजागरी पौर्णिमेच्या व लक्ष्मीदेवीच्या स्वागतास तयार असतात.

या कोजागिरी पौर्णिमेची एक आख्यायिका अशी भालचंद्र नावाचा एक गरीब ब्राम्हण आपल्या पत्नीसह पृथ्वीतलावर रहात होता. थोड्या जमेल तेवढ्या पुजा अर्चा करून उदर निर्वाह करीत असायचा. या भालचंद्राची पत्नी त्याच्यावर सदैव नाराज असायची कारण ती मोठ्या श्रीमंत घराण्यातील होती. परंतु वडिलांच्या सांगण्यानुसार

शा भालचंद्राशी नाईलाजास्तव लग्न केल होत. दरम्यान भालचंद्राच्या पत्नीच्या पित्याचे निधन झाल्यावर मात्र सगळीकडे गरीबी दिसू लागली. भालचंद्राच्या पत्नीच्या बहीणी मात्र श्रीमंतीत दिवस कंठत असत. त्या श्रीमंत बहीणी देखील तिला टोमणे मारत असत असे टोमणे ऐकून ऐकून तिला कंटाळा आला एके दिवशी तिने भालचंद्रा बरोबर जोरदार भांडण केले व बाहेर जावून कमवायला सांगितले. बिचारा भालचंद्र तिची खुप समजुत घालू लागला पण व्यर्थ आपण श्रीमंत व्हावे हीच तिची इच्छा... भालचंद्र सदैव तिला सांगायचा 'आहे त्यातच सुखी राहु' पण व्यर्थ शेवटी 'घरातून चालते व्हा' असा आवाज काढून तिने भालचंद्रला अपमानीत केले.

शेवटी चला काही तरी करू या या अपेक्षेने तो बाहेर पडला. घन दाट जंगले पार केल्यानंतर त्याला समुद्र लागला. समुद्राकाठी थोडे बसल्यावर त्याने देवाचा धावा केला. ती रात्र होती पौर्णिमेची पावसाचे दिवस संपून गेले होते. आश्विन महिना चालू होता. पौर्णिमेच्या रात्रीचे शुभ्र चांदणे पडले होते. भालचंद्र गरीबीने त्रासला होता. शिवाय बायकोवर रागावला होता. घराबाहेर पडल्यापासून त्याच्या पोटात अन्नाचा कणही नव्हता. गरीबीमुळे तशा त्या थंड रात्रीही त्याला अंगभर वस्त्र नव्हते. यामुळे तो तसाच कुडकुडत चालला होता.

## भालचंद्राला शंका

समुद्रकाठावरून चालत असतांना अचानक भालचंद्राच्या कानावर काही स्त्रियांचा कुजबुजण्याचा आवाज आला. दूर अंतरावर त्याला ३ नागकन्या बसल्या होत्या हे दिसले. त्यांनी सोंगट्याचा डाव मांडला होता. परंतु त्यांना खेळण्यासाठी एका भिडूची आवश्यकता होती. त्यातील एका नागकन्येचे लक्ष भालचंद्रावर गेले. त्याला जवळ बोलावून सोंगट्याचा खेळ खेळायला सांगितले. परंतु हा जुगार आहे हे खेळणे पाप आहे असे सांगून देखिल त्यांनी हट्ट धरला. शिवाय आज खेळल्याने कुठलेही पाप होणार नाही असे भालचंद्राला सांगितले. शेवटी हट्टाखातर तो सोंगट्याचा खेळ खेळू लागला. अगोदर आपला पंचा त्याने जुगारात गमवला त्याला भुक लागलेली बघुन त्या नागकन्यांनी त्याला नारळाचे पाणी पाजले. नंतर खेळ सुरुच होता. शेवटी तो जानवे हरला शेवटी भालचंद्राला शंका आली की, आजच्या दिवसाचे महत्व काय? त्यावर एकीने सांगितले.

आज आहे आश्विनी पौर्णिमा यालाच कोजागिरी पौर्णिमा म्हणतात. आजची रात्र चांदण्यात खेळण्यात घालवायची असते. म्हणजे हे काही व्रत आहे का? भालचंद्राने शंका प्रगट केली. तेव्हा त्या नागकन्यांनी त्याला कोजागरीची सगळी माहिती दिली. त्या म्हणाल्या—

आश्विनी पौर्णिमेला कोजागरी म्हणतात. या रात्री लक्ष्मी देवी पृथ्वीवर सगळीकडे फिरत असते. को–जागर्ति–कोण जागा आहे ! असे विचारत असते. रात्री जागे राहून जे खेळ खेळताना आनंदात गढलेले दिसतात. त्यांच्यावर ती प्रसन्न होते. या दिवशी उपास करायचा असतो. रात्री नारळाचे पाणी प्यायचे असते. म्हणूनच आम्ही तुम्हाला मधाशी जेवायला न घालता नुसते नारळाचे पाणी प्यायला दिले.

## दारिद्र्य नाहीसे होईल

तर मग मलाही उपास घडला. भालचंद्र म्हणाला हो म्हणूनच तुम्ही आता आमच्याबरोबर खेळत बसा म्हणजे मध्यरात्री लक्ष्मी आली की, तुमच्यावर ती प्रसन्न होईल. तुमचे दारिद्र्य घालवील. त्या तिघी नागकन्यांनी सांगितले.

पुन्हा खेळायला प्रारंभ झाला. सर्व खेळात हरल्यानंतर भालचंद्राने एक शेवटची अट त्या नागकन्यांना घातली. मी जर हा डाव जिंकला तर तुम्हा तिघांना माझ्याशी लग्न करावे लागेल. बोला कबूल ! त्याच्या गोष्टीचे तिघींना हसू आले.

आतापर्यंत हरलेला काय जिंकणार म्हणत त्यांनी या गोष्टीला होकार दिला. इतक्यात मध्यरात्र झाली. लक्ष्मीदेवी 'कोजागर्ति !' कोजागर्ति असे म्हणत हिंडू लागली. फिरता फिरता तो ही चौघेजण खेळ मांडून बसली होती तिथे येऊन ती पोहचली.

तिने खेळणाऱ्या चौघांकडे पाहिले तेव्हा तिला मोठे आश्चर्य वाटले. या तीन श्रीमंत नागकन्या आणि त्यांच्याबरोबर खेळणारा हा दरिद्री भालचंद्र ! लक्ष्मीच्या लक्षात आले की, त्यालाही आज कोजागिरीचा उपास घडला आहे. त्याच्या हातून आपले कोजागिरीचे व्रत झालेले आहे. त्याला आशिर्वाद देऊन त्वरित खूष करावे. चमत्कार झाला. सोंगट्यांचा तो 'पणाचा' डाव त्याच्या बाजूने लागला. आता मात्र नागकन्या घाबरल्या. इतक्यात लक्ष्मीला बघून ते सर्वजण उभे राहिले. देवीला नमस्कार करून त्यांना लक्ष्मीने आशिर्वाद देऊन भालचंद्राबरोबर जाण्यास सांगितले. धनाढ्य संपत्ती व हिरे, माणके, मोती घेऊन त्या भालचंद्राच्या घरी गेल्या. भालचंद्राची पत्नीही श्रीमंती बघून बेशुद्ध पडली. भालचंद्र लक्ष्मीच्या कृपेने व कोजागिरीच्या व्रताने श्रीमंत झाला होता.

असे हे महत्व आपल्यालाही कळो व भालचंद्राप्रमाणे लक्ष्मी आपल्यावरही प्रसन्न होवो ही सदिच्छा बाळगू या !

★

# श्री बाबांचा श्राद्धसोहळा

—सौ. उषा प्रभाकर मुळे
पेटकर वाडा, १६० नारायण पेठ पुणे ३०

● श्रीसाईबाबा पुण्यतिथीचा शिर्डीत होणारा धार्मिक श्राद्ध समारंभ; खरोखरच बघण्यासारखा असतो हे अनेकांना माहित नसेल. दसरा हा उत्सव श्री साईबाबांची पुण्यतिथी म्हणून समजला जातो. त्या दिवशी इतर उत्सवापेक्षा श्राद्धतिथी हा धार्मिक विधी महत्वाचा समजला जातो. व तो कशा स्वरूपात साजरा होतो, व त्याचा प्रसाद मला १५–१६ वर्ष कसा मिळाला हा एक स्वानुभवच आहे.

दसऱ्याच्या दिवशी दुपारचा आरती झाल्यावर हा विधी ( धार्मिक ) मंदिराच्या सत्यनारायण विभागात सुरू होतो. चांदीच्या देव्हाऱ्यात चांदीची श्री साईबाबांची सुदर मूर्ति विधीपूर्वक स्थापन केली जाते. फुलांच्या माळांनी केळीच्या खुंटानी देव्हारा सजविलेला असतो. मुख्य प्रशासक ( कोर्ट रिसीव्हर ) यांना पुजेचा मान असतो. ब्रह्म वृदांच्या मंत्रांच्या घोषात विधी सुरू असतो. तेथील वातावरण श्रीसाई-मंत्राने व जय घोषाने मंगलमय झालेले असते, प्रत्यक्ष श्री साईबाबाच तिथे अवतरले आहेत असा भास होत असतो. सर्व कार्यक्रम शिस्तबद्ध शांत रीतीने सुरू असतो. नैवेद्य आरती झाल्यावर निमंत्रित बहुतेक ( जोडपेच ) पति, पत्नि, यांची पूजा त्यांना वस्त्र, पुरुषाना धोतर व उपरणे दक्षिणा सुवासिनींना खण दक्षिणा अर्पण केली जाते, व त्यानंतर सुग्रास भोजनाचा कार्यक्रम श्लोकांच्या संगीतात सुरू होतो.

हा प्रसाद मिळणे फार भाग्याचे समजले जाते श्री साईनाथ माध्यमिक विद्यालयात, मी शिक्षिका होते, त्यावेळी मला या प्रसादाचा लाभ मिळाला हे माझे भाग्य समजते. आम्हा उभयताना हा मान मिळत होता. त्याची आठवण आता सेवा निवृत्ती नंतर येतच रहाणार आहे.

●

# साईकथा—एक ज्ञानगंगा

—कुमार **अमोल मनोहर पितळे**
पितळेवाडी, हनुमान रोड,
विलेपार्ले (पूर्व) मुंबई ५७

● गेली दोन वर्षे 'साईलीला' मासिकात प्रसिद्ध झालेले माझे दोन लेख आपण वाचले असालच. आता ह्या वर्षी साईकथा श्रवणाचा शालेय जीवनात कसा उपयोग होतो, त्यासंबंधी मला प्रत्यक्ष आलेला अनुभव मी सांगणार आहे.

माझे वडील, आई, माझे चुलतभाऊ व माझी छोटी बहिण इत्यादी मंडळी रोज रात्री श्री साईबाबांचे अनुभव ऐकत बसतो. हा अनुभव ऐकण्याचा जणू एक खास कार्यक्रम रोज आमच्या घरात रात्री झोपतेवेळी ठरलेला असतो. अर्थात मी लहान असल्यामुळे सध्यातरी अनुभव ऐकण्याची गोडीच चाखत असतो. रोज माझे बाबा किंवा आई आम्हा मुलांना एखादा तरी साईबाबांचा अनुभव सांगतात. त्यांनी तो न सांगितला तर आम्ही मुले अगदी हट्ट धरून बसतो, मग काय बालहट्ट तो, तो पुरविलाच पाहिजे. बाबा अनुभव सांगायला लागले की आम्ही मुले अगदी तल्लीन होऊन जातो. अर्थात् तो अनुभव बाबा आम्हाला गोष्टीरूपाने सांगत असल्यामुळे तो आम्हाला अधिकच आवडतो.

एकदा माझे वडील 'साईसच्चरितातील' नानासाहेब चांदोरकरांचा एक गोड अनुभव सांगत होते. जामनेर येथे नानासाहेबांची मुलगी प्रसूतीवेदना होऊन विव्हळत होती, त्यावेळी नानासाहेबांनी श्रीसाईबाबांचा धावा सुरू केला. शिर्डीत बाबांना अंतर्ज्ञानाने सारे समजले व त्यांनी आपला एक भक्त रामगीरबुवा यास जामनेरला जाण्यास सांगितले, व उदी व 'आरती साईबाबा' ही बाबांची आवडती आरती बरोबर दिली. पण रामगीरबुवा अतिशय गरीब असल्यामुळे त्यांच्याजवळ वाटखर्चीला पैसे नव्हते. परंतु बाबांनी त्यांना आज्ञा देऊन तुझी सारी व्यवस्था होईल असे सांगितले. रामगीरबुवा जळगाव स्टेशनवर उतरताच एक टांगेवाला शिर्डीचा रामगीरबुवा कोण असे ओरडत स्टेशनवर उभा होता. बुवांनी त्यांचा आवाज ऐकला व ते टांग्यात बसून नानासाहेब चांदोरकरांच्या घरी पोहचले. रामगीरबुवा खाली उतरले व वळून मागे पाहतात तो टांगा व टांगेवाला नाहीसा झाला होता. रामगीरबुवा घर शोधत शोधत नानासाहेबांच्या घरी आले. त्यांनी उदी व आरती त्यांना दिली. नानांनी उदी

पाण्यातून मुलीला देताच मुलगी सुखरूप बाळंत होऊन बाळ जन्माला आले. नंतर टांग्याबद्दल नानांजवळ चौकशी करताच नानांनी आपण टांगा पाठविला नव्हताच असे सांगितले परंतु त्यांना कळून चुकले होते की बाबांनी आपल्या दिव्य चमत्कारातून टांगा निर्माण केला होता.

वरील अनुभवातील **टांगा** व **टांगेवाला** हा शब्द माझ्या कानात घुमत होता. काही दिवसानी आमची वार्षिक परीक्षा आली. परीक्षेसाठी मी शाळेत गेलो. पेपर भाषा या विषयाचा होता. त्यात घोड्यांची गाडी चालविणारा कोण ? असा प्रश्न होता. कोणी घोडेस्वार तर कोणी घोडागाडीवाला लिहिले. मी मात्र बाबांच्या ऐकलेल्या गोष्टीवरून **टांगेवाला** असे लिहिले. अर्थात् माझे उत्तर बरोबर आले व जेव्हा निकाल लागला तेव्हा मला सर्वात अधिक गुण मिळून मी पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण झालो. बाबांच्या लीला ऐकल्या नसत्या तर माझा एक गुण गेला असता व नंबरही खाली गेला असता !

तेव्हा सर्व मुलांना माझी विंनती आहे की बाबांचे अनुभव ऐकण्याची व वाचण्याची संधी सोडू नका. बाबांची शिकवण तुम्हास ज्ञानी व कर्तृत्ववान करून सोडील यात शंकाच नाही.


## कलामहर्षि जाधव मास्तर यांच्या निवास स्थानी आता द्वारकामाई

मुंबापुरीतील प्रख्यात कलाकार व शिरडी येथे श्रीबाबांचा रथ अर्पण केलेले साईभक्त श्री. डी. के. जाधव मास्तर यांच्या बांद्रे येथील निवासस्थानी येत्या विजया दशमीच्या सुमुहूर्तावर द्वारकामाईची एक प्रतिकृती स्थापन करण्यात येत आहे. या सोहळ्यानिमित्त बुधवार ता. २७–१०–८२ ते गुरुवार ता. ४–११–८२ पर्यंत दररोज विविध कार्यक्रम व समारंभ आयोजित करण्यात आलेले आहेत. प्रत्येक दिवशी भारतातील एका श्रेष्ठ संताचे येथे दर्शन भक्तांना घडणार आहे. बुधवार दिनांक २७–१०–८२ रोजी सकाळी १० वाजता द्वारकामाईचे उद्घाटन होत असून श्रींच्या पादुकांचे अभिषेक, गजानंदाची व नंदादिपाची पुजा, धुनीची पूजा इ. कार्यक्रम होत आहेत. तरी सर्व श्रीसाई भक्तांनी या अमूल्य संधीचा लाभ घ्यावा अशी विंनती श्री. जाधवमास्तर करतात.

निवास व समारंभ स्थान गुरुप्रसाद, कलानगर बांद्रा (पूर्व) मुंबई ५१



नित्य मी जिवंत । जाणा हेचि सत्य । नित्य घ्या प्रचित अनुभवे ।

# देव भावाचा भुकेला

३२३

**—कु. रेखा दिघे**

● कुतर्काचा करा झाडा । ना तो करितील मार्गांत झगडा । अभिमान पायातळी रगडा । तरीच पैलतडा पावाल । असे सांगणाऱ्या श्रीसाईनाथांचे असंख्य भक्तगण या भूतलावर आहेत. श्रीसाईबाबांचे दरबारी भाषाभेद, जातीभेद, धर्मभेद मुळीच आढळणार नाही. सर्व धर्मियांचे आराध्य दैवत असलेली ही साईमाऊली वेळोवेळी भक्तांच्या हाकेस धावून जाते. भक्तांचे संकट निवारण करते.

रामनवमी हा श्रीसाईबाबांनी सुरु केलेला उत्सव, आजही मोठ्या धामधुमीने या पुण्यनगरीत साजरा केला जातो. ठिकठिकाणाहून भक्तजन येतात. बाबांच्या दरबारी राहून मनःशांति मिळवतात. दरवर्षी काही भक्तमंडळी मुंबईहून शिर्डीपर्यंत चालत जातात. यंदा ही संख्या ८० च्या आसपास होती. साईनामाचा जप करित, बाबांची पालखी घेऊन, ही मंडळी मोठ्या आनंदाने शिर्डीकडे डोळे लावून, फक्त साईदर्शनाची आस धरून, मार्गक्रमण करीत असतात. सर्वस्व हरपून केवळ बाबांशी एकरुप होऊन ही मंडळी शिर्डीस पोहोचतात. तीन दिवस रामनवमी उत्सवाचा आनंद लुटून जड अंतःकरणाने स्वगृही परततात. यंदा दि. २–५–८२ 'साईनिकेतन' मध्ये, (श्रीसाईबाबा संस्थानचे मुंबई येथील कार्यालय) सत्यनारायणाची पूजा करून, या मंडळींनी आपल्या पदयात्रेची सांगता केली. अनेक भक्तांनी या पूजेचा लाभ घेतला. साईनिकेतन येथील सर्व लहानमोठ्या तसबिरींना हार घालण्यात आले होते. हे हार याच हॉलमध्ये बसून बनविले होते. परंतु दि. ४–५–८२ रोजी सहज बाबांच्या शिळेवर बसलेल्या फोटोकडे दृष्टी गेली असता, या हाराची लांबी किंचित वाढल्यासारखी वाटली. म्हणून त्यावर लक्ष ठेवले. दुपारपर्यंत अधिक लांबी वाढली. अशारितीने रात्रीपर्यंत हाराची लांबी दुप्पटीपेक्षा जास्त वाढलेली लक्षात आली.

नित्य मी जिवंत । जाणा हेचि सत्य । नित्य घ्या प्रचित अनुभवे । या आपल्या वचनाची बाबांनी प्रचिती दिली असेच मानावे लागेल.

★

# ममता

• • •

—कु. सुषमा सू. गर्जे
८० आखाडे बिल्डिंग,
शिवाजीनगर, पुणे

● ममता सर्वांना हवी—हवीशी वाटणारी सर्वांची प्रिय आणि सर्वांत श्रेष्ठ शक्ती आहे. परंतु या कलियुगात मनुष्य ममतेला दुसऱ्याच दृष्टीकोनातून बघत असतो. जोपर्यंत आपण ह्या समाजाची सेवा करीत असतो, समाजासाठी राबत असतो तोपर्यंत समाज आपल्यावर ममता करीत असतो. पण जर शारीरिक दुर्बलतेसारख्या कुठल्याही कारणाने आपण परावलंबी झालो की समाजाला आपले ओझे झाल्यासारखे वाटते. उन्हाळ्यात ओढे सुकून जातात ना त्याचप्रमाणे सर्वांच्या हृदयातील ममता सुकून जाते, पाषाणासारखी कठोर बनते, वाळवंटातील वाळूचे रूप धारण करते.

मग प्रश्न पडतो की ममतेचा खरा अर्थ तरी काय आहे? कामापुरता मामा एवढेच तर नव्हे ना! प्राचीन काळातल्या ऋषि—मुनींनी हा शब्द कुठल्या अर्थाने वापरला? महाकाव्यांमध्ये, मोठ-मोठ्या धार्मिक, अध्यात्मिक ग्रंथामध्ये ममतेला दिलेले महत्व खोटे आहे का? ज्ञानी—योगींनी ममतेला ज्या अर्थाने पाहिले तो निरर्थक असू शकेल?

नाही! ह्या अज्ञानी आणि स्वार्थी जगात ममता आहे. फक्त एकाच ठिकाणी बाबांच्या हसऱ्या, तेजस्वी, दयाळू आणि मायाळू प्रतिमेत ही प्रतिमा मनाने रंगवलेली असो किंवा चित्रकाराने आपले मन त्या ममतेच्या रंगात रंगलेल्या प्रतिमेकडे आकर्षित होत असते. त्या प्रतिमेत आपल्याला 'श्रीसाई' न दिसता ममताच दिसत असते. ही ममता खरी आहे, निस्वार्थी आहे, अजर—अमर आहे. ह्या ममतेत मातेचे मातृत्व आहे.

साईच्या भक्तांवर जेव्हा संकट आणि काळजी आपले काळे पाखरूण घेऊन येते तेव्हा भक्त सगळीकडून निस्सहाय होतो आणि बाबांकडे शरणाची याचना करतो. अशा दुर्बळ भक्ताला साई ममतेने कुरवाळतात. आपल्या तेजस्वी डोळ्यानी क्रूर काळोखावर मात करतात आणि भक्ताचे भाग्य दीप्तिमान करतात. बाबांच्या ममतेच्या प्रवाहात भक्ताचे मन वाहून जाते. श्री साईंची ममता लहानांना—मोठ्याना

सर्वांना सारखीच आहे. बाबांच्या ममतेने सुख–दुःख, आशा–निराशा सगळे एकाच धाग्यात गुंफले जातात–समाधानाच्या, निर्मळ आनंदाच्या.

ह्या कलियुगात ममता आहे. ममता चिरंजीव आहे. ममतेच दुसरे नाव श्री साईनाथ ' आहे.

★

# देवीच्या कृपेने साई सद्गुरु भेटले

—कुमार जगदीश हिबारे
सिंगारबाग, घर नं. १–८ २५
मु. पो. बिदर (कर्नाटक)

● मी तुळजा भवानीच्या देऊळातील देवीच्या गाभाऱ्यात गेलो आणि देवीच्या समोर हात जोडून तिची मनोभावे विनवणी करू लागलो, ' माय भवानी माझ्या वडीलांना चिंतेतून सोडव. त्यांना सुखी कर. आमचे दैन्य घालव ' ही माझी विनंती जणू देवीने ऐकली व तिची गाभाऱ्यातील पाषाणाची मूर्ती उंच उंच होऊ लागली व सजीव होऊन ती झन् झन् आवाज करीत खाली उतरली. हे सर्व मी आश्चर्य चकीत होऊन पहात होतो. आईभवानी मजजवळ आली. मी लगेच तिच्या कमरेला मिठी घालून तिची आराधना करू लागलो अश्रू ओघळत होते. तेव्हा देवीने मला वर उचलले व म्हणाली ' बाळ घाबरु नकोस जा माझ्या देऊळाची एक फेरी घालून ये. ' तिची आज्ञा मानून मी देवीला नमस्कार केला व फेरी घालण्यासाठी बाहेर आलो व फेरी घालण्यास सुरुवात केली. देऊळाची अर्धी फेरी झाली नाही तोच माझ्या आईची हाक कानावर आली ' राजन् ये आम्ही घरी चाललोत. ' ते ऐकताच मी अर्ध्यावर फेरी थांबवून तेथूनच भवानी आईची क्षमा मागितली अन् नमस्कार केला. आई-वडीलांबरोबर घरी जाण्यासाठी निघालो. असे हे स्वप्न मी पहाटेच्या ६ च्या सुमाराला पहात होतो. जागा झालो स्वप्नाची आठवण होताच मी स्वयंपाक घराकडे धाव घेतली, आणि संपूर्ण स्वप्न आईला सांगितले. तेव्हा आई म्हणाली भवानीची आराधना केली पण अजून काही तरी शिल्लक आहे. ते पूर्ण होताच आपल्याला चांगले दिवस येतील. आई बोलल्याप्रमाणे ऑक्टोबरला दसऱ्याच्या

पौर्णिमेला आम्ही आमची कुलदेवता तुळजाभवानीच्या दर्शनासाठी तुळजापूरला गेलो. पुढे तीन महिन्यानी म्हणजे जानेवारीला ध्यानी मनी नसताना काही अशा घटना घडल्या की, एका साईभक्ताच्या कृपेने आम्ही शिरडीस पोचलो. अशा-रितीने साईबाबा आम्हाला सद्‌गुरु भेटले. शिरडीहून परत येताना वाटेत तुळजा-पूरवरूनच आमची बस आमच्या मुकामाला येते. तेव्हा कुलदेवतेला ओलांडून पुढे जाणे योग्य नाही. म्हणून आम्ही पुन्हा तुळजापूरला उतरलो. देवीचे दर्शन घेऊन परतलो. त्याचवेळी माझ्या स्वप्नाची आठवण देत आई म्हणाली, 'राजन् आज आपली फेरी पूर्ण झाली.' आईने सांगितल्याप्रमाणे पुढे तीन महिन्यानी म्हणजे मार्च महिन्यात उगादीच्या पाडव्या दिवशी माझ्या वडिलांनी आपल्या नवीन जागेत दवाखान्यासाठी मुहूर्त केला. अन् जादूच्या कांडीप्रमाणे आमचे हलाखीचे दिवस फिरले ते केवळ साईसद्‌गुरूंची कृपा म्हणून.

आज माझे वडील आणि आम्ही सर्व घरातील मंडळी साईबाबांना अनन्य भावनेने भजतो. याप्रमाणे ज्या कोणाला साईसद्‌गुरू भेटतील त्याचे दैन्य गेल्या-शिवाय रहाणार नाही.

सद्‌गुरू शिरडी साईनाथ की जय.

★

## श्रीमती यमुनाबाई सांडभोर साईचरणी विलीन

शिरडीस श्रीबाबांच्या उत्सवाला भारुडाचा कार्यक्रम करणारे पुण्याचे साईभक्त श्री. रघुनाथ बाबुराव सांडभोर यांच्या मातोश्री श्रीमती यमुनाबाई यांचे २७-८-८२ रोजी वयाच्या ८० व्या वर्षी पुणे मुक्कामी निधन झाले त्या साईभक्त होत्या व नेहमी घरात काय किंवा शेतावर काय कामे करताना 'साईराम साईराम' असे म्हणत असत. त्यांच्यामागे २ मुले २ मुली जावई व सूना व नातवंडे नि असंख्य साईभक्तांचा परिवार आहे.

श्रीसाई मृताच्या आत्म्यास चिरशांती देवो.

# श्रीबाबांची कृपा

—कुमार **अमरिश द. प्रधान**
द्वारा द. र. प्रधान
१७, कोटेचा नगर, राजकोट ३६०००१

● आमच्या घरी श्रीसाईबाबांची पुजा, भजन भक्तिभावाने केले जाते. माझ्या आईबाबांची व आम्हा भावंडांची बाबांवर फारच श्रद्धा आहे. प्रत्येक क्षणी श्रीबाबांना हाक मारली की त्यांचे हाकेला उत्तर येतेच ! गोष्टी छोट्या आहेत कदाचित वडील मंडळींना त्या महत्वाच्या वाटणारही नाहीत. पण माझ्या बालमनाला त्या फार मोलाच्या वाटतात.

मी अगदी लहान बाळ होतो. सुमारे १२–१३ महिन्यांचा असेन, तेव्हा माझी आई मला दुधाची बाटली घेऊन दूध पाजीत होती. मी हातपाय उडवित मस्ती करीत होतो नि बाटलीने दूध पीत होतो. एकदम माझ्या आईच्या हातातून बाटली निसटली व ती दुधाने भरलेली काचेची जड बाटली माझ्या नाकावर दणकन् आदळली. मी एकदम कळवळलो आणि माझा श्वास कोंडला. मी डोळे फिरवले. माझे ओंठ निळे पडले व हातपाय ताठ झाले. जवळच माझे वडील उभे होते. त्यांनी मला उभे धरले. कानात, टाळूवर जोरात फुंक मारली. पण माझ्या तोंडातून आवाज फुटेना व शरीर कागदासारखे होऊन गेले. कोणाला काही सुचेना. आई 'साईराम, साईराम' म्हणत धावली व पूजेतील श्रीबाबांचा फोटो आणून तिने माझ्या कपाळाला लावला नि एकदम मला श्वास घेता आला व मी मोंठ्याने रडू लागलों. माझी आई आनंदाने रडू लागली आणि सर्वांनी सुटकेचा निश्वास सोडला. माझ्या आईने हा प्रसंग मला सांगितला.

दुसरा प्रसंग म्हणजे आत्ताच दोंन महिन्यापूर्वी शाळेच्या समारंभात मी भाग घेतला होंता. आमची मुलांची शाळा असल्यामुळे मुलींची कामे मुलांना करावी लागतात. वसंत=नृत्यामध्ये मला मुलीचा ड्रेस करावयाचा होंता. माझ्या मोंठ्या बहिणीने मुलीचा ड्रेस, दागिने वगैरे गोष्टींनी मला सुंदर तयार केले होंते. कानात घालण्यासाठी बहिणीने तिच्या मैत्रिणीकडून चापांच्या कानातल्या इअररींग्ज आणल्या होंत्या. त्या रींग्ज इंपोर्टेड होंत्या. आमच्या नृत्याला वेळ होंता म्हणून सर्व मुले आमच्यासाठी राखून ठेवलेल्या गॅलरीतून दुसरा प्रोंग्राम पाहत होंतों. तेथे एकतर खूप गर्दी होंती व अंधारही होता. मला रींग्ज खूप

टोंचू लागल्या म्हणून मी त्या काढून हातात ठेवल्या. नंतर वेळ झाल्यावर परत त्या रींग्ज कानात घालू लागळों तर एक रींग निसटली. मी कपडे झटकले नि खाली वाकून अंधारात चाचपडून पाहू लागळों पण ती मिळेना. माझ्या हातापायांना दरदरून घाम सुटला. मौल्यवान इअररींग हरवली म्हणून घरचे लोंक ताईची मैत्रीण सर्व मला रागावणार ह्या विचाराने मला रडू येऊ लागले. मला एकदम श्रीबाबांची आठवण आळी. मी मनात म्हणाळों, 'बाबा, रींग सापडू द्या. मी तुम्हाला वीस नमस्कार घालीन.' नि काय आश्चर्य, मळा पाठीला काहीतरी टोंचले. मी हात मागे नेला नी रींग माझ्या हातात आली. बाबांनी माझी हाक ऐकली.

तिसरा प्रसंग म्हणजे शाळेच्या वार्षिक परीक्षेत ड्रॉइंगची परीक्षा होंती. वेळ दोंन तास होंता. चित्र काढून त्यात वॉटर कलर भरायचे होंते. चित्र खूपच कठीण होंते. पहिला तास संपळा तेव्हा जेमतेम चित्र पुरे होंत आले होंते. पण मुख्य म्हणजे वॉटर कलर व्यवस्थित भरायचे काम सर्वच बाकी होंते. मी खूपच नर्व्हस झालों. पण मग श्रीसाईमाऊलीची आठवण आली, नी मनातल्या मनात करुणा भाकली, 'बाबा, मला मदत करा नि मग काय आश्चर्य, सर्व चित्र व्यवस्थित रंगवून पूर्ण झाले. कोंठेही डाग पडला नाही, खोंडाखोंड नाही. वेळ संपला तेव्हा वर्गातील पाऊण भाग मुलांचे ड्रॉइंग अपूर्ण राहिले होंते. मुले हिरमुसलेली दिसत होंती. पण मी मात्र खूप खूप आनंदात होंतों. बाबांनी माझं ड्रॉइंग पूर्ण केलं! ही सारी त्यांचीच कृपा!

## देववाणी

# महादेवींचे स्वरूप

ॐ सर्वे देवा देवीमुपतस्थुः 'कासि त्वं महादेवीति'॥ १ ॥ साब्रवीत्–अहं ब्रह्मस्वरूपिणी। मत्तः प्रकृतिपुरुषात्मकं जगत्। शून्यंच अशून्यंच ॥ २ ॥ अहमानन्दानानन्दी। अहं विज्ञानाविज्ञाने। अहं ब्रह्माब्रह्मणी वेदितव्ये। अहं पञ्चभूतान्यपञ्चभूतानि। अहमखिलं जगत् ॥ ३ ॥ वेदोऽहमवेदोऽहम्। विद्याहमविद्याहम्। अजाहमनजाहम्। अधश्चोर्ध्वं च तिर्यक्चाहम् ॥ ४ ॥

समस्त देव देवीच्या समीप गेले आणि त्यांनी नम्रतापूर्वक देवीला विचारले, 'हे महादेवी! तू कोण आहेस?' (तुझे सत्य स्वरूप काय आहे?)

देवी म्हणाली, 'मी ब्रह्मस्वरूपिणी आहे. हे प्रकृतिपुरुषात्मक सद्रूप जग माझ्याचपासून निर्माण झाले आहे.'

'मी आनंदरूपा असून अनानंदरूपाहि आहे. मी विज्ञानरूपा म्हणजे अनुभवरूपा असूनहि अविज्ञानरूपा म्हणजे अननुभवरूपाहि आहे. मी जाणून घेण्यास योग्य अशी ब्रह्मरूपाहि आहे, आणि अब्रह्मरूपाहि मीच आहे. सर्व पञ्चीकृत अपञ्चीकृत अशी जी पंचमहाभूते आहेत तीहि मीच आहे. हे अखिल दृश्य जगत् मीच आहे.

सर्व वेद मीच आहे. जे जे काही अवेद, वेदविरहित आहे तेहि मीच आहे. मी विद्यारूपिणी आहे आणि अविद्यारूपिणीहि मीच आहे. मी अजा–अनादि अजन्मा प्रकृति–आहे आणि अनजा म्हणजे व्याकृत प्रकृतीहि मीच आहे. मी खाली-नीचातिनीच योनीत असलेले प्राणिमात्रहि आहे. त्याचबरोबर वर उच्च योनीतील देवताहि मीच आहे. त्याहूनहि निराळी आजूबाजूला पसरलेली सर्व सृष्टीहि मीच आहे.

**—देव्यथर्वशीष**


**ॐ साईराम**

**सतीश**  **ट्रॅव्हल्स**

मुंबई – शिर्डी – मुंबई मिनी बस सर्विस प्रत्येकी रु. १२०/– फक्त

बुधवार / शनिवार सकाळी ९ वाजता दादर येथून निघून, शिर्डी येथे मुक्काम

गुरुवार / रविवार शिर्डीहून दुपारी १ वाजता निघून साकोरी, मुक्तिधाममार्गे मुंबईस रात्रौ ९ वाजता येईल.

**अधिक माहितीसाठी खालील पत्त्यावर संपर्क साधा.**

**श्री. सतिश राव**

'साईनिकेतन' रुम नं. ७

डॉ. आंबेडकर रोड दादर मुंबई ४०० ०१४

# आणि दाढ दुखी थांबली

—कुमार मनोज रमेश चव्हाण
साईनिकेतन दुसरा मजला, गुजरलेन कॉर्नर,
नवापूर मु. पो. ता. नवापूर जि. धुळे
पिन ४२५४१८

● साडेतीन मुहूर्तापैकी एक मुहूर्त म्हणून अक्षयतृतिया आहे. हा दिवस आमच्या खान्देशात विशेष महत्वाचा गणला जातो. ह्या दिवशी घरोघर गोडधोड म्हणून पुरणपोळीचा होत असतो. आमच्याही घरी पुरणपोळीचाच बेत होवा. दुपारची जेवणं वगैरे आटोपल्यानंतर माझ्या वडीलांची दाढ एकाएकी दुखायला लागली.

वडीलांनी कॅलेंडर पाहीले तारीख होती २६-४-८२ त्यानंतर आपल्या वयाचा हिशेब करून म्हणालेत, 'सध्या ३६ वर्षे वय आहे. म्हणजेच तारुण्यच नाही का? आणि तारूण्यात दाढदुखी निर्माण झाल्याने पुढे कसे काय होईल?'

या विचारांनी ते बेचैन झालेत. दाढदुखीचे अनेक लोक वडीलांनी पाहीले होते. दाढदुखीने होणाऱ्या वेदना किती भयंकर असतात हेही जाणून होते. आणि म्हणूनच दुखणे लवकर बरे व्हावे यासाठी ते सायंकाळी पाचच्या सुमारास दवाखान्यात गेले.

डॉ. नारखेडे यांनी बाहेरच्या चांगल्यापैकी गोळया लिहून दिल्या तेव्हाच्या तेव्हा बाजारातून गोळया आणल्या. रात्री मिठाच्या व तुरटीच्या पाण्याच्या गुळण्या केल्या. एकदोन दिवस दुखणे नरम पडले.

तशात माझ्या आते बहीणीसाठी मालपूर दोंडाईचा येथील स्थळ आल्याने वडीलांना बैठकीसाठी तेथे जाणे जरूरीचे होते. रात्रीच्या फास्टने दोंडाईचा येथे गेल्यानंतर तेथे पुन्हा दाढ उसळली. वडीलांना झोपही लागू देत नव्हती. सारखा ठणका येत होता. अर्धमस्तक, कान, घसाही दुखू लागला त्यामुळे ते फारच त्रस्त झाले कशाकडेच लक्ष लागत नव्हते. सकाळ झाल्यावर मालपूरला जाण्याआधी त्यांनी दोंडाईचा येथील मेडीकल स्टोअर्समधून पुन्हा गोळया घेतल्या. गोळया घेऊनही आराम पडत नव्हता उलट दाढ अधिकाधिक दुखत होती. मालपूर येथील बैठकीत आतेबहीणीचे लग्न निश्चित ठरले. यजमानांनी मिष्टान्न बनविले परंतु गोड खाल्याने दाढ अधिक दुखेल म्हणून खाण्याचे टाळले.

मालपूर येथील डॉ. पवार यांना दाढ दाखवून त्यांच्याकडून गोळ्या घेतल्या. नंतर संध्याकाळी पुन्हा दोंडाईचा येथे परत आले. साखरपुडा पिंपळनेर येथे दि. ६-५-८२ रोजी ठरला. माझ्या मावस बहीणीचे व मामेभावाचे लग्न अनुक्रमे ३ व ५ रोजी झोडगे व मालेगाव येथे असल्याने त्या लग्नास सुद्धा उपस्थित रहाणे वडीलांना महत्वाचे होते.

दाढदुखी असतानाही वडील दोंडाईचाहून धुळे मार्गे झोडग्यास गेले. आता तर दाढदुखीने कहरच केला होता. तेथील डॉ. रविंद्र यांच्याकडे तपासून गोळ्या घेतल्या. तात्पुरती दाढदुखी पुष्कळ प्रमाणात कमी झाली. तेथील लग्नातही गोड खाण्याने कटाक्षाने टाळले तरीही रात्री पुन्हा त्रास होऊ लागल्याने आणखी गोळ्या घेतल्या. दि. ५ रोजी मालेगावला लग्न असल्याने मामा व वडील तिकडे रवाना झाले. मालेगाव शहरात व परीसरात डॉ. अल्ताफ यांची ख्याती असल्याने त्यांच्याकडेही गेले.

डॉ. अल्ताफ यांनी दाढ पाहील्यानंतर लागलीच सांगितले, 'एका दांढेल दोन बाजूनी छिद्र असल्याने ती काढावीच लागेल परंतु सध्या सूज असल्याने गोळ्या देतो आठ-दहा दिवसानी दाढ काढण्यास या.' दि. ६ रोजी वडील मालेगावहून पिंपळनेर येथे आतेबहीणीच्या साखरपुड्यासाठी आले. कसेबसे जेवण केले. दाढदुखी फार वाढली होती. पुन्हा पुन्हा औषधोपचार गोळ्या घेऊन तोंडात उष्णता वाढली होती. आता गोडच काय परंतु तिखट खाणे सुद्धा बंद झाले. आतेबहीणीच्या लग्नाची २० तारीख निश्चित करून नवापूरला आले.

स्नान वगैरे आटोपून साईबाबांपुढे ध्यानस्थ बसले व प्रार्थना केली की, 'भाचीचे लग्न असल्याने निदान ८-१० दिवस आधी मदतीला जाणे जरूरीचे आहे पण दाढदुखी खूप त्रास देत आहे. २२ तारखेपर्यंत तरी थांबवा असे म्हणून त्यांनी दाढेस उदी लावली आणि काय आश्चर्य आजपावेतो दाढ पुन्हा उसळली नाही. असे आहेत साईबाबा श्रद्धा असल्यावर आजार पटकन् बरा होऊ शकतो हेच खरे.

# जेव्हां बाबा मला बोलावतात

☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆

—कुमार आशिष विजय हजारे
सी/६, गुंफादर्शन फर्स्ट कार्टर रोड,
बोरीवली पूर्व मुंबई ६६

● 'ओ शिर्डीवाले शिर्डी मुझे बुलाले' असे मी कित्येक दिवसांपासून बाबांना विनवीत होतो की आता तरी मला शिर्डीला जाऊन बाबांच्या दर्शनाचा योग यावा दोनतीन वर्षा पासून मी शिर्डीला गेलो नव्हतो. म्हणून या फेब्रुवारीच्या संमेलनाच्या निमित्ताने तरी जायला मिळावे अशी माझी इच्छा होती, आणि पुढचे वर्ष दहावीचे महत्वाचे वर्ष असल्यामुळे जायला मिळणारे नव्हते. परीक्षा दिड महिन्या वर येऊन ठेपल्या होत्या.

माझ्या बाबांनी (वडिलानी) मला शिर्डीस नेण्यास साफ नकार दिला. नंतर त्यांनी माझ्या आईला विचारून त्यावर पूर्णपणे विचार केला व ठरवले की, आता ह्याला पुढल्या वर्षी तरी कुठे जाता येणारच नाही तेव्हा ह्या वेळी न्यावे. शक्यतो फेब्रुवारी–मार्च महिन्यामध्ये तिकिटांचे रिझर्व्हेशन मिळणे खूप कठीण असते. पुष्कळ खटाटोप करून माझ्या वडिलानी आमच्या एस. टी च्या तिकीटा मिळवल्या.

आता शिर्डीला जायला फक्त चार दिवस उरले होते. मला शिर्डीस जायला मिळणार म्हणून मी अगदी खुषीत होतो. आता हा जाण्याचा कार्यक्रम एक दिवसावर येऊन ठेपला होता. आदल्या दिवशी रात्री आम्ही आमचे जाण्याचे कपडे व सामान बॅगान मध्ये भरून बॅगा लाऊन ठेवल्या. सकाळी शाळेत जायचे म्हणून मी लवकर झोपून गेलो. सकाळी सगळे आटोपून शाळेत गेलो. शाळेत फक्त थोडी थोडी थंडी वाजत होती. शाळेतून आल्यावर मला डोके जड झाल्या सारखे वाटत होते. म्हणून मी जेवून झोपलो मला खूप थंडी वाजत होती, मला वाटले ती पंख्यामुळे असावी म्हणून मी पंखा घालवला तरी काही परिणाम झाला नाही, मला दोन दोन जाडी उबदार अंगावरणेही अपुरी होती. मी कुडकुडत होतो आणि माझे दात वाजत होते. कोणाला सांगितले तर आपल्याला शिर्डीला जायला मिळणार नाही म्हणून मी आपला गप्प पडून राहिलो. ही गोष्ट काही खूप वेळ टिकू शकली नाही. माझ्या जवळ बसलेल्या माझ्या बहीणीला सारखे धक्के बसत होते. तिने ही गोष्ट माझ्या आईस सांगितली कारण माझे दात ही कडाकड वाजत होते. माझ्या आईने लगेच माझे अंग

बघितले खूप तापल्यासारखे वाटले म्हणून तिने मला थरमामीटर लाऊन पाहिले. मला तीन ताप होता. तिने लगेच माझ्या डोक्यावर मीठाच्या पाण्याच्या घड्या ठेवल्या एवढे सगळे झाल्यावर आता 'ह्याला कसले शिर्डीला जायला मिळते असे सगळ्यांना वाटले.' परंतु माझी इच्छा दांडगी होती 'शिर्डीला जायचे म्हणजे जायचे' पाच वाजता मी आमच्या डॉक्टरांकडे गेलो. त्याना हे सगळे सांगितले. पण त्यांनी मला सांगितले की 'एवढा ताप असताना तुला जाता येणार नाही' मी हट्टच धरला. ह्यावर त्यांनी मला दोन दिवसाचे औषध व गोळ्या दिल्या व 'जर सात वाजे पर्यंत ताप कमी झाला तरच जायचे' असे बजावले.

मी घरी येऊन साईबाबांची मनापासून प्रार्थना केली, व गोळ्या घेऊन झोपलो. सात वाजता माझे बाबा ऑफिसमधून परतले त्यावेळी माझा ताप जरा कमी झाला. घरातल्या सर्व लोकांनी मला न जाण्याचा सल्ला दिला. मी कोणाचे न ऐकता माझ्या ठाम निर्णयालाच चिकटून राहिलो. आठ वाजता थोडेसे चाऊन साडे आठ वाजता आमची स्वारी घराबाहेर पडली. बॉम्बे सेंटर एस. टी. स्थानकावर आमची साडे दहाची एस. टी. होती. पावणे दहाला आम्ही तिथे पोचलो. एस. टी. लागलेलीच होती. रिझर्वेशन असल्याने जागेचा प्रश्नच नव्हता. एस. टी. मध्ये बसल्यावर मी एकदा औषधाचा डोस घेतला व आपल्या जागेवर बसून राहिलो. माझ्या वडिलांनी माझे अंग पाहिले. मला थोडा सुद्धा ताप नव्हता. सकाळी शिर्डीला पोचेपर्यंत मी चांगली झोप काढली. शिर्डीला उतरल्यावर मी अगोदर त्या देवळाला लांबून नमस्कार केला. नंतर गुरुस्थानाजवळील इमारतीत चेंदवणकर ह्यांच्या खोलीत आमचे सामान ठेवले व जरा ताजे होऊन आम्ही समाधी मंदिराकडे गेलो. मला तर त्या साईबाबांच्या त्या पवित्र प्रतिमेला केव्हा पाहिनसे झाले होते. ती पाहण्यासाठीच माझा जीव व्याकूळ झाला होता. मी समाधी मंदिरात जाऊन बाबांचे दर्शन घेतले. त्यांनी माझे मन प्रसन्न झाले. माझा ताप जणू साईबाबांना पाहून पळून गेला होता.

त्यानंतर आठ वाजता सकाळी आम्हाला आक्का आई ( डॉ. सुमती खानविल-कर ) व इंदूमती ( डॉ. इंदूताई नाईक ) भेटल्या. ह्या दोन दोन डॉक्टरबरोबर असताना मला तापाची काळजीच नव्हती. त्यांनी माझी काळजी घेतली व वेळच्यावेळेवर डोस ( औषधाचे ) घेण्यास आठवण केली. नंतर आम्हाला एक रूम मिळाली आमची सगळी राहण्याची सोय निट झाली. तिथे मी चार दिवस राहिलो पण ह्या चार दिवसात एकदाही 'टेंप्रेचर' नव्हते.

तर जेव्हा साईबाबा आपल्या भक्तांना बोलवतात तेव्हा त्यांना तापच काय, पण कोणीही अडवू शकत नाही, आणि अशा प्रकारे माझा शिर्डीचा प्रवास सुखरूप झाला.

# बाबांनी माझ्या आईचे काविळीच्या दाढेतून रक्षण केले

—कुमार दिपक रा. रेवणकर
बालाजी मंदिराजवळ, कुंटोली
अंबरनाथ, जि. ठाणे

● शनिवार दि. ८ ऑगस्ट ८१ या दिवशी आमच्यावर मोठा प्रसंग आला. एक महीन्यापासून माझी आई काविळीने आजारी होती. काही आयुर्वेदीक औषधोपचार चालू होता. कारण पुष्कळ लोकांच्या म्हणण्यानुसार काविळीत गावठी औषध चांगले म्हणून तेच औषध चालू होते. पण आज शनिवार सकाळ पासून आईला खुपच त्रास होत होता. तिला धड श्वासोच्छवासही घेता येत नव्हता की धड बोलताही येत नव्हते. मी तसाच शाळेत गेलो होतो. संध्याकाळी शाळेतून आल्यावर समजले की आई जास्त सिरीयस झाल्याने डोंबीवलीच्या डॉ. राव हॉस्पीटलमध्ये तिला ॲडमीट केलय. मी तसाच शेजारील लोकांबरोबर हॉस्पीटलमध्ये आईला पाहण्यास गेलो. आईला पाहून घाबरुन गेलो कारण आईला सलाईन लावलेले अन बेशुद्धावस्थेत अशी होती. डॉ. नी सुद्धा जास्तच सिरीयस असं सांगितले होतं. मला खुप खुप भिती वाटत होती.

मनातून मी एकसारखा साईबाबांचा धावा करत होतो. सर्वच जण साईबाबांचे नामस्मरण करत होते. औषधोपचार चालूच होते. कावीळ जास्त प्रमाणात झाल्याने पुऱ्या शरीरातील रक्तांत ती भिनली गेली होती. त्यामुळे आईला बरे होण्यास बरेच दिवस लागले. एक महीना सलाईनवर हॉस्पीटलमध्ये रहावे लागले. ह्या अवधीत दररोज कोणी ना कोणी शिर्डीवरुन बाबांचा प्रसाद घेवून येत असे, म्हणजे दररोज प्रसाद देवून साईबाबांनीच आमच्यामध्ये धैर्य निर्माण केलं.

तशातच आईची एक मानलेली बहीण सौ. ज्योती नाडकर्णी ही स्वतः साई-भक्त असून नर्स आहे. ती डोंबिवलीत राहते. आईला ॲडमीट केले त्याच दिवशी १० दिवसांची रजा घेऊन ती शिर्डीला गेलेली. माझे वडील तिला सांगायला घरी गले तर ती घरी नाही. पण तिला का कोण जाणे शिर्डीत राहयला मनच झाले नाही. गेलेल्याच्या दुसऱ्याच दिवशी साईबाबांनी तिला शिर्डीवरून परत डोंबिवलीला आपला

# बाबांनी माझ्या आईचे काविळीच्या दाढेतून रक्षण केले

—कुमार दिपक रा. रेवणकर
बालाजी मंदिराजवळ, कुंटोली
अंबरनाथ, जि. ठाणे

● शनिवार दि. ८ ऑगस्ट ८१ या दिवशी आमच्यावर मोठा प्रसंग आला. एक महीन्यापासून माझी आई काविळीने आजारी होती. काही आयुर्वेदीक औषधोपचार चालू होता. कारण पुष्कळ लोकांच्या म्हणण्यानुसार काविळीत गावठी औषध चांगले म्हणून तेच औषध चालू होते. पण आज शनिवार सकाळ पासून आईला खुपच त्रास होत होता. तिला धड श्वासोच्छवासही घेता येत नव्हता की धड बोलताही येत नव्हते. मी तसाच शाळेत गेलो होतो. संध्याकाळी शाळेतून आल्यावर समजले की आई जास्त सिरीयस झाल्याने डोंबीवलीच्या डॉ. राव हॉस्पीटलमध्ये तिला ॲडमीट केलय. मी तसाच शेजारील लोकांबरोबर हॉस्पीटलमध्ये आईला पाहण्यास गेलो. आईला पाहून घाबरुन गेलो कारण आईला सलाईन लावलेले अन बेशुद्धावस्थेत अशी होती. डॉ. नी सुद्धा जास्तच सिरीयस असं सांगितले होतं. मला खुप खुप भिती वाटत होती.

मनातून मी एकसारखा साईबाबांचा धावा करत होतो. सर्वच जण साईबाबांचे नामस्मरण करत होते. औषधोपचार चालूच होते. कावीळ जास्त प्रमाणात झाल्याने पुऱ्या शरीरातील रक्तांत ती भिनली गेली होती. त्यामुळे आईला बरे होण्यास बरेच दिवस लागले. एक महीना सलाईनवर हॉस्पीटलमध्ये रहावे लागले. ह्या अवधीत दररोज कोणी ना कोणी शिर्डीवरुन बाबांचा प्रसाद घेवून येत असे, म्हणजे दररोज प्रसाद देवून साईबाबांनीच आमच्यामध्ये धैर्य निर्माण केलं.

तशातच आईची एक मानलेली बहीण सौ. ज्योती नाडकर्णी ही स्वतः साई-भक्त असून नर्स आहे. ती डोंबिवलीत राहते. आईला ॲडमीट केले त्याच दिवशी ८-१० दिवसांची रजा घेऊन ती शिर्डीला गेलेली. माझे वडील तिला सांगायला घरी गेले तर ती घरी नाही. पण तिला का कोण जाणे शिर्डीत राहयला मनच झाले नाही. गेलेल्याच्या दुसऱ्याच दिवशी साईबाबांनी तिला शिर्डीवरून परत डोंबिवलीला आपला

कृपाप्रसाद घेवून पाठवले. आम्हाला बाबांचा प्रसाद पाहून व ती आलेली पाहून खुप आनंद झाला. एक प्रकारे बाबांचा आशिर्वादच होता तो.

आम्हा सर्वांच्या आर्त हाकेला श्री साईबाबा धावून आले, आणि माझ्या आईला क्रूर कावीळीच्या जबरदस्त विळख्यातून सोडवले. ही खरोखरच साईबाबांची आमच्यावरील मोठी कृपा आहे. असेच वेळोवेळी श्री साईबाबांनी आम्हाला अनेक संकटातून तारलेले आहे. आम्हा कुटुंबीयांना संकटकाळी तारणारी, धैर्य देणारी श्री साईकृपा ही एक महान अदृश्य शक्ती आहे. आम्हा सर्वांची साईबाबांवर अतुट श्रद्धा आहे व साईबाबांचेही आम्हावर कृपाछत्र आहे. ते तसेच कायम जन्मोजन्मी राहो हीच साईचरणी अखंड प्रार्थना.

## श्री. गोविंदराव बागवे यांचे निधन

श्रीसाईबाबा संस्थान शिर्डीचे मंदिर व्यवस्थापक श्री. विठ्ठलराव बागवे यांचे ज्येष्ठ बंधू श्री. गोविंद विष्णू बागवे यांचे २१ ऑगस्ट ८२ रोजी मुंबई मुक्कामी देहावसान झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ७० वर्षांचे होते.

श्री. गोविंदराव यांचा जन्म मालवण तालुक्यातील मसुरे (गावठणवाडी) येथे झाला. नोकरी निमित्य ते मुंबईस आले, पुढे मसुरे एज्युकेशन सोसायटी मुंबई या संस्थेत काम करीत असताना गावातील शाळा-आर. पी. बागवे हायस्कूल बांधण्यात त्यांनी पुढाकार घेतला. बागवे समाज सेवा संघ, मुंबई या संस्थेच्या संस्थापकां पैकी ते एक होत. त्यांनी विविध प्रकारे समाज सेवा करून संघाची तहहयात सेवा संघाच्या जडण घडणेस अग्रेसर पुढाकार घेतला. मसुऱ्यांच्या श्रीमाऊली देवी मंदिराच्या जिर्णोद्धारात त्यांनी तळमळीने भाग घेतला. श्रीसमर्थ बागवे महाराज संस्थान मसुरे या संस्थेचे ते सहाय्यक चिटणीस होते. श्रीदत्त मंदिर मसुरेच्या जिर्णोद्धारात त्यांनी बहुमोल मार्गदर्शन केले. गावठणवाडी मसुरेच्या उत्कर्षासाठी त्यांनी प्रथम पासूनच काम केले. त्यांच्या गावातील घराशेजारी श्री संत पाचलेगावकर महाराज यांच्या प्रेरणेने बांधल्या गेलेल्या पतित पावन मंदिराचे मूळ प्रवर्तक तेच होत. तसेच मुंबई व मसुरे येथील अनेक सामाजिक संस्थेशी त्यांचा घनिष्ठ संबंध होता. ते साईबाबा भक्त होते. त्यांच्या मागे त्यांच्या पत्नी सहा पुत्र, दोन सुना, दोन नातू, दोन भाऊ, तिन बहिणी व इतर परिवार आहे.

श्रीसाई मृत आत्म्यास चिरशांती व सद्गती देवो

# उदीमुळे गाठ नाहीशी झाली

—कु. प्रशांत हसमुख पाटील
(वय १२ वर्षे) गुजरगल्ली, मु. पो. ता.
नवापूर, जि. धुळे, पिन–४२५४१८

● श्रीसाईबाबांचा मी एक छोटा बालभक्त आहे. मी इ. ६ वी पास होऊन इ. ७ वीत गेलो. शाळा सुरू होऊन दोन महीने झाले असतील. ऑगस्ट १९८१ ची गोष्ट आहे.

माझे आईवडील श्रीसाईबाबांचे निस्सीम भक्त आहेत. त्यांच्या प्रेरणेमुळे व मला आलेला श्रीसाईबाबांच्या उदीच्या अनुभवामुळे मी देखील श्रीसाईबाबांचा एक छोटा बालभक्त झालो आहे.

सन् १९८१ च्या ऑगस्ट महिन्यातील ही घटना आहे. एके दिवशी सकाळची प्रातर्विधी आटोपून व आंघोळ करून मी शाळेत जाण्याची तयारी करू लागलो. डोक्याला तेल लावून मी भांग पाडीत असताना माझा डावा हात अचानक डाव्या कानाच्या खाली गेला व अगदी कानाजवळ एक लहानशी गाठ आहे असे मला आढळून आले. सुरुवातीला एक–दोन दिवस मी दुर्लक्ष केले. परंतु दोन–तीन दिवसा नंतर मला कळाले की कानाजवळची गाठ दिवसें दिवस वाढत चालली आहे. तेव्हा मला चिंता वाटू लागली, आणि एके दिवशी मी माझ्या वडीलांना ही गाठ दाखविली माझ्या वडीलांनी काना जवळ हात लावून ती गाठ पाहिली आणि माझे वडिल मला म्हणाले की प्रशांत! तुझी बाबांच्या उदीवर श्रद्धा आहे ना! मग तू रोज शाळेत जाताना बाबांचे नामस्मरण करून चिमूटभर उदी गाठीवर चोळून घेत जा म्हणजे तुझी ही गाठ बाबांच्या उदीने नाहीसी होईल.

मी माझ्या वडिलांच्या सांगण्याप्रमाणे दररोज नियमीतपणे सतत आठ दिवस-पर्यंत श्रीसाईबाबांवर श्रद्धा ठेवून गाठीवर उदी चोळीत गेलो, आणि आठ दिवसांनी हात लावून पहातो तो काय आश्चर्य! कानाजवळची गाठ अजिबात नाहीसी झाली. 'खरोखर! बाबांची उदी म्हणजे असाध्य रोगावरील एक रामबाण औषधच होय.' 'बाबा म्हणजे जणू काय साऱ्या विश्वाचे डॉक्टरच आहेत.' अशा श्रीसाईबाबांना माझे कोटी कोटी प्रणात!

श्रीसाईबाबांच्या पुण्यतिथीला दसऱ्याच्या मुहूर्तावर 'साई-निकेतन' दादर टी. टी. येथे प्रसिद्ध होत आहे.

**फक्त श्रीसाई साहित्याला वाहिलेला एकमेव दिवाळी अंक**

पाने १५०) **• साईप्रसाद •** (किंमत ८ रु.

रेखाताई दिघे, डॉ. चारुशिला गुप्ते, ले. कर्नल निंबाळकर, डॉ. इंदूताई नाईक, सदानंद चेंदवणकर, डॉ. सौ. सुमती खानविलकर, डॉ. सौ. मालती राहाटे, ॲड परुळेकर, डॉ. परचुरे, शशिकला रेवणकर, गुंडेराव पटवारी, उषा अधिकारी, प्रा. पुजारी, पंढरीदास खर्डेकर, श्री. ताई शहाणे, डॉ. गव्हाणकर, कलावती चव्हाण, विक्रम आरोळकर, शकुंतला जगतकर, प्रभाकर कोळमकर, ॲड कद्दू, चित्रा मुदलीयार, विलासिनी बिजानी, श्री. दत्ताराम बारस्कर आदि नामवंतांचे सकस साहित्य...साईकथा, निबंध लेख...कविता

१) विविध साईदरबार, साईमंदिरे, साईसंत भक्त ही सचित्रमाला

२) जया मनी जैसा भाव विज्ञानाला आव्हान देणारी अनुभवमाला

३) साईचरणी लीन झालेले सिनेकलावंत ही अभिनव लेखमाला आणि मी साईबाबांना प्रथम पाहिले आणि...ही श्रीसाई प्रत्यक्ष पाहिलेल्या पुण्यवंतानी साकार केलेली शब्द सुमनमाला अशा एकापेक्षा एक सुरस आणि सरस चार लेखमाला...

**वार्षिक राशी भविष्य**–शिवाय सर्वच मननीय, चिंतनीय साहित्या-सह: बाबांच्या हयातीतील अनेक दुर्मिळ फोटोसह

श्रीसाई छबीचे बोलके मनमोहक रंगीत मुखपृष्ठ. मागील वर्षाची 'श्रीसाईकृपा' न मिळाल्यामुळे झालेली निराशा टाळण्यासाठी खालील पत्त्यावर अंकाची किंमत रु. ८+५ रु. रजिस्टर पोस्टेजने पाठवून आपली प्रत आजच राखून ठेवा.

**विजय हजारे** – द्वारा कृपाशू प्रकाशन
सी/६ गुंफा दर्शन, फर्स्ट कार्टर रोड,
बोरिवली-पूर्व मुंबई नं. ४०० ०६६

एकमेव एजंट – **मे. बागवे ॲण्ड कंपनी** गिरगाव, दादर, बोरीबंदर ठाणे, पुणे.

# साईबाबांची कृपा

• • •

—कु. पुष्पलता दत्तात्रय रायकर
अमर कुंज, भारत हौसिंग सोसायटी,
१० वी गल्ली राजारामपूरी, कोल्हापूर

● श्री साईबाबांवर माझी नितांत श्रद्धा आहे. आतापर्यंत मी अनेक साईलीला-मधून अनेक साई भक्तांचे अनुभव वाचत आले होते पण मलाही आता त्या अनंत कोटी ब्रह्मांडनायक राजधिराज योगीराज परब्रह्म श्री साईनाथ महाराजांचा असाच एक अनुभव आलेला आहे.

गेल्या वर्षी आम्ही शिरडीत गेलो होतो. आम्ही जाताना कोल्हापूरमधून निघून पुण्यात उतरलो व सकाळच्या गाडीने आम्हाला शिरडीस जावयाचे होते. गाडी साडे सहाला होती तेव्हा थोड्याच वेळान आम्ही सकाळचा नाष्टा करायचा म्हणून पुण्यात शिवाजीनगरमध्ये काकां हॉटेलात गेलो व गडबडीने नाष्टा केला. आमच्याबरोबर लहान मूल असल्यामुळे आम्ही त्याच्याकरिता दूध मागविले व ते गार करून बाटलीत भरण्यासाठी म्हणून आम्ही आमच्या कडचीच दोन स्टीलची फुलपात्रे बाहेर काढली व गडबडीत ती त्याच हॉटेलमध्ये टेबलावर विसरून आम्ही गाडीत येऊन बसलो, व आम्हाला जवळ जवळ गाडी नगरमध्ये पोचल्यावर समजले की आम्ही आमची फुलपात्रे त्या हॉटेलमध्येच विसरलो व आम्ही त्यांची आशाच सोडून दिली. कारण एवढ्या काळजीपूर्वक ती कोण काढून ठेवणार. नंतर आम्ही शिरडीत जाऊन मनपूर्वक बाबांचे दर्शन घेऊन आलो. आम्ही पुण्यातूनच आलो व येताना बाबांचे चिंतन करीत आलो बरे आम्ही असे ठरवले की खास फुलपात्रासाठी पुन्हा शिवाजी नगरमध्ये आम्हाला काही जाता येणार नाही तेव्हा एस. टी. जर योगायोगाने बाबांच्या कृपेने गेली तर आपण विचारू. आणि गाडी बाबांच्या कृपेने शिवाजीनगर स्टँडवर थांबली व आम्ही त्या हॉटेलमध्ये गेलो होतो त्या हॉटेलमध्ये सहजपणे श्री साईबाबांची आराधना करून त्या मालकाला विचारले, आणि बाबांच्या कृपेने त्या मालकाने आम्हाला आत जाऊन आमचीच फुलपात्रे बाहेर आणून दिली. त्यावेळेस आम्हाला किती आनंद झाला तो लिहिता येणार नाही. अशी आहे आमच्यावर बाबांची कृपा.

बाबांवर जसा भाव असेल तसे फळ हमखास मिळते.

✣

# श्री साईशरणानंद साईचरणी विलीन



परमसाईभक्त श्री साईशरणानंद उर्फ बापूजी पूर्वाश्रमीचे सॉलीसिटर श्री. वामनभाई प्राणगोविंद पटेल यांचे बुधवार दिनांक २५ ऑगस्ट ८२ रोजी अहमदाबाद येथे देहावसान झाले.

त्यांचा जन्म १८८९ साली गुजरातेतील सुरत जिल्ह्यातील बारडोली तालुक्यातील मोटा या गावी झाला. वयाच्या ७ व्या वर्षी आपल्या चुलत्या बरोबर ते सोमनाथ दर्शनासाठी गेले असताना मंदिराबाहेर त्यांच्या नजरेला कुणी एक फकीर दिसला. त्यांना पुढे याच भागात अनेकदा त्या फकीराचे दर्शन मिळाले. पुढे १९११ साली प्रथमच त्यांना शिरडीत श्री साईबाबांचे दर्शन घडले तेव्हा त्यांना असे कळून चुकले की सोमनाथ मंदिराजवळ भेटलेले फकीर म्हणजे हेच श्री साईबाबा होत. ते बी. ए. एल. एल. बी. होते.

१९११ पासून १९१८ पर्यंत व पुढेही प्रत्येक वर्षी शिरडीस बाबांच्या दर्शनाला जात. बाबा त्यांना 'बाबू' या नावाने हाक मारीत असत. ते दीर्घकाळ त्यांच्या सहवासात होते. आपल्या गुर्जर बंधूना बाबांचा जास्तीत जास्त परिचय करून देण्याच्या उद्देशाने त्यांनी 'श्री साईबाबा' हा सुमारे ४०० पानांचा ग्रंथ १९४६ साली लिहिला. श्रीसाई सच्चरित्राचे गुजरातीत भाषांतर त्यांनीची केलेले आहे. याशिवाय संत नामदेव, धर्मकथा, चांगदेव पासष्टी, नित्यपाठ, अंबरीष, शुकदेव, गजेंद्रमोक्ष, उपासनी चरित्र, सिद्धांतमाला, स्त्रीनुऐश्वर्य इ. पुस्तके प्रसिद्ध करून गुर्जर साहित्याचे आध्यात्मिक दालन सुशोभित केले आहे. श्री बाबांनी त्यांना २७ वर्षांपूर्वी आज्ञा केल्यानुसार त्यांनी १९५३ साली साईशरणानंद हे नाव धारण करून भगव्या रंगाची वस्त्रे परिधान करून संन्यास धर्माची दीक्षा घेतली, व त्या वस्त्रांना शोभा येईल अशा रीतीने ते वागू लागले. ते साईबाबांचे निस्सिम भक्त होते व त्यांनी आपले सारे जीवन साईसेवेतच व्यतीत केले. श्री साईभक्त मंड-ळींनी श्री बाबांचा नयन मनोहर भव्य संगमरवरी पुतळा मुंबईचे विख्यात शिल्पकार श्री. बाळाजी वसंत तालीम यांचेकडून घडवून घेतला त्या पुतळ्याची प्रतिष्ठापना १९५४ साली शिरडी येथील बाबांच्या समाधी मंदिरात श्रीसाई शरणानंद यांचे हस्ते करण्यात आली होती. निधन समयी त्यांचे वय ९३ वर्षांचे होते.

आम्ही श्री साईशरणानंदजींच्या भक्तपरिवार मंडळींच्या दुःखात सहभागी आहोत. श्री साईबाबा शरणानंदजींच्या आत्म्याला शांती आणि सद्‌गती देवोत.

[श्री साईशरणानंदजींचा परिचय श्री साईलीला सप्टेंबर १९७५ च्या अंकात गाठीभेटी–१३ या सदरात आम्ही दिला होता.—का. संपादक]

★

# योगीराज रामभाऊ सामंत यांचे महानिर्वाण

—श्री. मनोहर कोचरेकर
कोळीवाडी, मुंबई ४

रत्नागिरीचे रत्नसमान रामभाऊ सामंत यांच्या नुकत्याच झालेल्या महानिर्वाणाने त्यांचे असंख्य भक्त पराकाष्ठेचे पोरके झालेले आहेत. योगीराजांचे चाहते जसे रत्नागिरीत आहेत तसे मुंबईतही आहेत. दोन्हीही ठिकाणचे श्री. रामभाऊ सामंत यांचे मठ त्यांच्या मोलाच्या मार्गदर्शनामुळे नावारूपाला आलेले आहेत. गेली पन्नास वर्षे रामभाऊनी पीडितांची सेवा व्रतस्थवृत्तीने केली.

शहेनशहा बाबर यांने आपल्या आत्मकहाणीत म्हटल्याप्रमाणे थोर व्यक्ति जरी काळाच्या उदरात विलय पावली तरी त्या व्यक्तीचे विचार अनंतकाळापर्यंत रेंगाळत असतात. या दृष्टीने माझी खात्री आहे की रामभाऊनी आजच्या धावत्या जगाला तुम्ही प्रपंचासाठी वाजवी वेळ देऊन बाकी सारा वेळ परमार्थासाठी द्या. हा जो संदेश दिलेला आहे तो अत्यंत मौलिक आहे. रामभाऊ म्हणत असत की धार्मिक उत्सव हे आपण उपकार करतो या भावनेतून साजरे करायचे नसून स्वतःचे कल्याण करण्याच्या उमेदीने ते हिरीरीने पार पाडायचे असतात. मुख्य म्हणजे उत्सवाने भक्तसंख्या प्रचंड वाढत असते. अशी रामभाऊंची धारणा होती म्हणूनच त्यांना शिरडीच्या आध्यात्मिक आरोग्याबद्दल धन्यता वाटत असे. भक्तजनांचा पिंड हा कोणत्या ना कोणत्यातरी ईशसेवेने पोसला पाहिजे हीच तर त्यांची पोटतिडिक होती.

म्हणूनच रामभाऊंनी अर्धशतकाच्या आपल्या आध्यात्मिक जीवनात आपल भजनसंकीर्तनाचा गुरुवार कधीही चुकविला नाही. भक्तजनांच्या संख्येने देखील त्यांच्या उत्साहाला कधी ओहोटी लागली नाही. प्रतीवर्षीचा आनंदजयंतीचा सोहोळा ते मोठ्या वैभवाने साजरा करीत. रामभाऊंच्या या भजनपरायणतेमुळेच मी त्यांच्या निगर्मनानंतर त्यांच्या अंधेरीच्या आध्यात्मिक आरोग्यकेंद्रात सेवा भावनेने गीता-प्रवचन सप्ताह पार पाडला. माझी खात्री आहे की योगीराजांच्या संचार पुण्याईने त्यांची साधना पुढे हिरीरीने चालवणारे त्यांचे असंख्य पाईक तयार होतील. श्रीकृपेने रामभाऊच्या वैकुंठ मुक्कामी असलेल्या आत्म्याला अक्षयशांती लाभो हीच माझी साईचरणी सलगी!

# सीमोल्लंघन !

शिलंगणाला काढुनि कपडे
काय बाबांनी दाखविले ?
इथून तिथून मानव सारे
मुळीच नसती वेगवेगळे !

शरीर-ढाचा एकसारखा
आत्मा तर एकच की हो
मग काहो म्हणता या शरिराला
मी हिंदू तो मुस्लीम हो ?

अल्ला त्यांचा ईश्वर तुमचा
केवळ बाबांनीच निराळे
पटते का हो सांगा तुम्हा
पटण्याजोगे काय नसे ?

आत्मा म्हणजेच ईश्वर अल्ला
चैतन्याचे नाव दुजे
पशु पक्षी कीटक मानव
सर्वांतरयामी तोच वसे !

—श्री. रघुनाथ शं. जुन्नरकर,
५, वसंत अपार्टमेंटस
कस्तूर पार्क, शिंपोली रोड,
बोरीवली ( प. ), मुंबई ४०००९२

# श्रीसाईबाबांचा दसरा उत्सव

जाऊ या आपण सारे शिर्डीनगराला
साईंचा दसरा उत्सव पहाण्याला
होते तेव्हा असंख्य नरनारींची तिथे गर्दी
अंतरज्ञानी साईंना भक्त आल्याची लागते वर्दी ॥ १ ॥

निघते शुभनवमीला श्रींच्या पोथीची मिरवणूक थाटात
परतुनी दशमीला येते ती समाधीमंदिरात
बनतात भक्तगण झोळ्या घेऊन भिक्षेकर
मागतात ते भिक्षा पाच दारोदार ॥ २ ॥

करतात सुवासिनी थाटाने त्यांचे स्वागत
मग मिळतो त्यांना झोळीतील धान्याचा प्रसाद
श्रींचे निशाण व शमीचे पूजन खंडोबाचे द्वारी करतात
करून सांजेला सिमोल्लंघन भक्तगण सोने लुटतात ॥ ३ ॥

श्रीसाईंच्या चरणी गोदावरीमाता सोने वहातात
काल्यादिनी मध्यान्हीला ते हंडी फोडतात
घेतात मग भक्तगण परतीचा निरोप आनंदानी
होतो अशा रीतीने बाबांचा उत्सव थाटानी ॥ ४ ॥

—सौ. वसुंधरा रा. चोरे
८०३, सी लक्ष्मी भुवन
डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई

# भजन

( चाल—डफडीवाले )

शिर्डीवाले...साईबाबा,
तेरी शिर्डी बुलाती है,
मैं गाऊं...तु सिखा...ऑ...ऑ...ऑ...

तेरे बिना शिर्डी, हरदम है सुनी, करते है तुझको पुकार
यादो में तेरे, भक्तों है तेरे
करते हैं शिर्डी को फेरे....शिर्डीवाले ॥ २ ॥

तेरी यह माया, सबको लगी है,
सबको है, तेरा वरदान

तू है त्राता, भाग्य विधाता
सबका है दाता महान,
मैं भी गाऊ, भक्तों भी गावे,
दे दो हमें वरदान, शिर्डीवाले....॥ ३ ॥

—नरेंद्रकुमार मधुकर खैरनार,
वय वर्षे १२
रा. नवापूर, जि. धुळे

# साई सेवा

बोला बोला साईबोला ।
चला जाऊ शिर्डीला ।
डोळे भरुन पाहू साईलीला ।
सदा राहू साईचरणी गुरु भक्तिला ।
अष्टगंधी चंदन लावू साईपादूकेला ।
मनोभावे वंदन करु साईमूर्तीला ।
पंचज्योतीचे निरंजन करुनी ।
पंचारती ओवाळू साई देवाला ।
वाहून घेऊ सारे जीवन साई सेवेला ॥

—कु. वंदना सावंत
११ गोल्डन पॅलेस, टर्नर रोड
मुंबई वांद्रे ५०

☆ ☆ ☆

# शिर्डी माझे माहेर

माझे माहेर शिर्डी
साईनाथांची पंढरी ॥ धृ० ॥
बाप माझे आई माझी ते प्रभूसाई ।
दर्शन घेता, प्रसाद घेता आनंद होई ॥ १ ॥

होई ऽऽ माझे माहेर०...........
बहीण माझी, सखी माझी ती धुनी माई ।
उदी लाविता, अगर सेविता कल्याण होई ॥ २ ॥

होई ऽऽ माझे माहेर०...........
एका जनार्दने शिर्डी माझी आगर होई ।
होई ऽऽ माझे माहेर०..........

—गणेशकुमार राघोबा पिळणकर
मु. पो. पाटगाव, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर

# साईस्तवन

मुखामध्ये असावे नाम साई ।
ती मोठी आहे तुमची माई ॥ १ ॥

बाबांवर ठेवा श्रद्धा आणि सबूरी ।
ईच्छा तुमची होईल पूरी ॥ २ ॥

रोज कपाळी लावावा अंगारा बाबांचा ।
सतत आशीर्वाद असो त्यांचा ॥ ३ ॥

जिकडे तिकडे बाबा वासकरी ।
बाबांचे सतत असते लक्ष भक्तांवरी ॥ ४ ॥

कधी न आणितो व्यवसाय इंग्रजीचा ।
मग आठविते बाई घेणार व्यवसाय इंग्रजीचा ॥५॥

नाव घेतो श्री साई ।
बघा साईची केवढी ही माई ॥ ६ ॥

विचारितो सरांना, सांगतात सर ।
बाई आज गैरहजर ॥ ७ ॥

बाबा भक्तांसी माफ करी ।
कधी न रागवी भक्तांवरी ॥ ८ ॥

जन्मभर सेवा तुमची करू ।
सतत तुमचे चरण धरू ॥ ९ ॥

—कुमार राजेश जनार्दन
एक/६१ गणाधिराज को. ऑ. हौसिंग
सोसायटी मिठागर रोड, मुलुंड (पूर्व) मुं. ८१

# चला जाऊ या शिरडीला

चला जाऊ शिरडीला
माझ्या बाबांच्या गांवाला ॥ धृ ॥

बाबांचा गाव छोटा
पण त्याचा शान मोठा
गोडगोड लोणीसाखर खायला
चला चला काकडआरतीला ॥ धृ ॥

अभिषेकाची गर्दी फार
घेऊन प्रसाद आणि हार
साहित्य घेऊन लाईनीला
भक्त निघाले दर्शनाला ॥ धृ ॥

बाराची ती आरती
भक्तजन ती करिती
विनविती अपुल्या साईला
चला बाबा आता जेवायला ॥ धृ ॥

संध्याकाळची सांजआरती
रात्रीची ती शेजारती
भक्तगण ते आळविती
चला आता बाबा शेजेला ॥ धृ ॥

तुटक्या शब्दात गाई ली
माझी साई माऊली
आशीर्वाद द्या लेकराला
तुमच्या माधव बाळाला ॥ धृ ॥

—कुमार माधव वसंत सामंत,
डी–८ बँक ऑफ इंडिया 'वृन्दावन'
हाऊसिंग सोसायटी, कोलडोंगरी
२ री गल्ली, सहार रोड,
अंधेरी (पूर्व) मुंबई नं. ४०००६९

# साई भगवंता

साई भगवंता आलो मी शरण ॥ ध्रु० ॥

आलो मी तुज शरण
येऊ दे केव्हाही मरण
करू दे मज भजन
साईनामी होऊन तल्लीन ॥ १ ॥

नाचू दे बेहोश होऊन
जावू दे धुंद होऊन
राहू दे भक्तीची धुंदी
होऊ दे मज आनंदी ॥ २ ॥

सकाळ दुपार तिन्ही त्रिकाळ
जीव्हेवरी 'साई' राहू दे नाम
येऊ दे मरण कृतान्तकाळ
'उदय' म्हणे जय साई राम

—कुमार उदय मधुकर
१७८, सोमवार पेठ पुणे–४

# साईनाम मंत्र

चला भक्त आवडीने
जाऊ शिर्डी धाम
गाऊ साई नाम—आवडीने ॥ १ ॥

भावे आळवूया
साईनाथ देवा
आनंदाचा ठेवा—करू प्राप्त ॥ २ ॥

वाचती ऐकती
साईनाम मंत्र
जीवनाचे तंत्र—सापडेल— ॥ ३ ॥

साईनाम मंत्र
धरा दृढ बुध्दी
होई कार्यसिध्दी—आपोआप ॥ ४ ॥

—कुमार विपीनचंद्र रमेश चव्हाण
साई निकेतन, दुसरा मजला गुजरलेन कॉर्नर,
मु. पो. ता. नवापूर, जि. धुळे पिन ४२५४१८

# साई रे साई

साई रे साई तू पवित्र साई
तू मेरे रुप में है
तू सबका मालिक है
तू मेरा है । मैं तेरा हूँ ।
कोई भी अलग अलग नहीं है ।
सब है भाई भाई
सब भगवान के बच्चे हैं ।
हम सब तेरे हैं ।
साई साई तू है साई
तू मेरा मैं तेरा हूँ ।

—कुमार राहुल अशोक खानविलकर, लोणावळा

## प्रो. चंद्रकांत कंदाडे (ॲडव्होकेट) साईचरणी विलीन

गिरगाव पोर्तुगीज चर्च येथील प्रख्यात इंटरआर्टस क्लासेस (१९४३) चे प्रो. चंद्रकांत शंकरराव कंदाडे (ॲडव्होकेट) यांचे गुरुवार दि. २६ ऑगस्ट १९८२ रोजी पहाटे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले. त्यांचे वय ६१ वर्षांचे होते.

कै. कंदाडे यांनी समाधिचे चौथऱ्यास एक चांदीची प्लेट व चौथऱ्यापुढील दोन्ही कठडे चांदीने मढवून दिलेले आहेत. तसेच बाबांसाठी सोन्याचा मुलामा दिलेला एक चांदीचा मुगुटही देणगी दाखल दिलेला आहे.

दरवर्षी सहकुटुंब शिर्डीस जाण्याचा नियम त्यांनी शेवटपर्यंत ठेवला होता. कोणत्याही शुभकार्यास सुरुवात करताना प्रथम बाबांची पूजा करण्याचा त्यांचा रिवाज होता. ते एक निस्सिम साईभक्त होते. याची प्रचिती त्यांना गुरुवारीच देवाज्ञा झाली या योगायोगावरुन येते.

श्रीसाईबाबा मृतात्म्यास चिरशांती व सद्‌गती देवोत.

# साई प्रार्थना

साईनाथा रात्रंदिन लागो मनास चिंतनाचा छंद ।
साईनाथा तुझ्या चरणी दर्शनाचा द्यावा मला प्रसाद ॥१॥

लोटू नका दुरी हो, तुम्ही बाप आणि माता ।
साईनाथा मन नित्य शांत होवो, तव गुण-गान गाता ॥२॥

साईनाथा नको देऊ आशा धन मुक्तीची ।
साईनाथा दे भक्ती तव चरणाची ॥३॥

साईनाथा तुझे रुप डोळ्यांनी पहावे ।
साईनाथा तुझे गुण कानांनी ऐकावे ॥४॥

साईनाथा लाभो माझ्या मनास समाधान शांती ।
वसो तुझ्या चरणी मन माझे हीच प्रार्थना नम्र अंती ॥५॥

—कुमार सुनिल गणपतराव खुस्तले
माळीवाडा मु. पो. ता. पैठण
जि. औरंगाबाद ४३११०७

★

# साईनाथ-आरती

जय श्रीसद्‌गुरू जय गुरूदेव जय साईनाथा
का हो धरिले आपण हे मौन आता ।

विसरूनी गेला काय ? आम्हासि नाथा
पामर आम्ही नित्य गातो तव गाथा ।

सुखकर सद्‌गुरु मम मनी मंगल तव मूर्ती
त्रिभूवनी गाजतसे अखंड तव किर्ती ।

जगाचे असता तुम्ही करताकरविता
सत्वपरीक्षा घ्यावी आपण कशीही सदा ।

मतीमंद अज्ञानी आम्ही तव दास
पूजन करितो नेमे धरी तव चरणास ।

तव शुभनाम घेता अती हर्षनादे
विकसित निर्मल करी त्वा आमुची बालमने ।

वाटे सदा आम्ही नित तुज भेटावे
पितयासम तव सोज्वळ रूप अहा पहावे ।

हेच्चि वरदाना आम्ही मागतसे
पूर्ण करावी देवा चरणा वंदीतसे ।

—कुमारी सुरेखा गंगाराम पळ
७/५५, मानाजी राजुजी चाळ,
न्यु प्रभादेवी रोड, मुंबई २५

# जाऊ शिरडीला

[ डोंबिवलीचे साईभक्त कवी श्री. राधाकृष्ण गुप्ता चेतन यांचे चिरंजीव राजेशने केलेली ही छान पैकी कविता ]

चला चला जाऊ शिरडीला
साईबाबांच्या दर्शनाला ॥ १ ॥

मंदिराचा तो कळस दिसतसे
मन माझे मोहुन घेत असे ॥ २ ॥

मंदिरात ह्या भक्तांची गर्दी
बाबांकडे देत असे वर्दी ॥ ३ ॥

बाबा बघतात चोहीकडे
आनंदी, आनंद होत असे ॥ ४ ॥

शिरडी आहे पावन ग्राम
भूमीवरचे स्वर्णिम धाम ॥ ५ ॥

—कुमार राजेश राधाकृष्ण गुप्ता ( १६ वय )
पाटकर वाडा भगतसिंग पथ, डोंबिवली (पूर्व)
जिल्हा–ठाणे ४२१ २०१

# स्वप्नी साई आले

असे एकदा घडले
माझ्या स्वप्नी साई आले
मशिदमाई मध्ये बाबा
शिळे वरती बसलेले

अभ्यास नाही केला बाबा
पास कसा मी होणार ?
आई आणि वडिल मजला
रागे नक्की भरणार !

केविलवाणे पाहून माझे
मुख तुम्ही वदलात मला
" धुनी माईतील उदी बाळा तू
लाऊन जारे शाळेला ! "

असे म्हणूनि हात आपुला
पाठीवर हो फिरवीला
आणि दचकुनि उठुनि बसलो
चिंता मुरली मुळी मजला

पास कराया आहे आता
साईबाबा बसलेला

—कुमार सौरभ अरुण शहाणे
लक्ष्मी–निवास, गडकरी रोड,
डोंबिवली ( पूर्व ) ठाणे

# साई के वास्ते

बिदर, आंध्र प्रदेश निवासी प्रा. गुंडेराव पटवारी के सुपुत्र दिपककुमार रचित श्रीबाबा के बारेमें एक भावप्रधान काव्य—

जान से अधिक हमें शिर्डी से प्यार है,
साई के वास्ते काफिला भी तैयार है,

हम साई भक्तों की जाति और धर्म एक है,
भक्ती के लिए हमारा हर इरादा नेक है,

दुसरों के सामने हम कभी झुकेंगे नहीं,
साई के सिवाय बोलो, कही रुकेंगे नहीं,

साई का प्यार और शक्ति हमारे साथ हैं,
साई के वास्ते काफिला भी तैयार है,

श्रद्धा बढाओं, सबुरी रखो, नारा हमारा,
जान की परवाह मत करो, शिर्डी प्यार हमारा

दिपक कह रहा है, साई का हमको प्यार हैं,
साई के वास्ते काफिला भी तैयार हैं !

—कुमार दिपककुमार पटवारी
घर नं. ३–२–५१, ब्राह्मणवाडी
बिदर ५८५४०१